दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ५५ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.२१ डिसेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro, Tourism & Adventure Park

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

कोळोणा (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

# पदे येतात जातात, मंत्रिपद न मिळालेल्या आमदारांना पुढच्या टप्प्यात संधी देणार-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा नाराजांना श्रद्धा सबुरीचा संदेश

**नागपूर (वृत्तसंस्था)–विधानसभा निवडणुकीत महायुतीने प्रचंड बहुमत मिळवत सत्ता स्थापन केली. त्यानंतर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधी तसेच हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्र्यांचा देखील शपथविधी पार पडला. मात्र, महायुतीमधील घटकपक्षांमधील काही आमदारांना मंत्रिपद मिळाले नसल्याने नाराजीनाट्य देखील पाहायला मिळाले आहे. शिवसेना शिंदे गटातील अनेक आमदार नाराज असल्याची चर्चा आहे. यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले, पदे येतात जातात. ज्यांना मंत्रिपद दिले त्यांच्यात क्षमता आहे आणि ज्यांना दिले नाही त्यांच्यात क्षमता नाही, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. आमच्याकडे संख्या जास्त आहे, काहीवेळा काही लोकांना श्रद्धा आणि सबुरी ठेवावी लागते, असे शिंदे म्हणाले.**



पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, जे आमदार आता पहिल्या टप्प्यात मंत्री बनले नाहीत, ते पक्षाचे आणि संघटनेचे काम करतील. त्यांना दुसऱ्या टप्प्यात संधी देऊन पहिल्या टप्प्यातील आमदारांना तेव्हा पक्षाचे काम करायला सांगू. हे रुटीन आहे आणि हीच कामाची पद्धत आहे, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी दुसऱ्या टप्प्यात आमदारांना मंत्रिपदाची संधी मिळणार असल्याचे सूचित केले आहे.

दरम्यान, विजय शिवतारे आणि प्रकाश सुर्वे तसेच नरेंद्र भोंडकर यांनी देखील त्यांची नाराजी उघडपणे व्यक्त केली होती. यावर एकनाथ शिंदे म्हणाले, विजय शिवतारे यांनी येऊन मला सांगितले की एकनाथ शिंदे यांचा विश्वासू सहकारी या पदाशिवाय मला दुसरे काही नको. हेच सर्वात मोठे पद आहे. प्रकाश सुर्वे हे देखील मला येऊन भेटले आहेत. नरेंद्र भोंडेकर यांनीही मला येऊन सांगितले आहे. पण हे लोक आता पुन्हा जोमाने काम करणार आहेत. आमची जबाबदारी आता वाढली आहे, असे शिंदे म्हणाले.पदे येतात आणि जातात, पदापेक्षा आपले उत्तरदायित्व आपले लोकांशी नाळ जोडली आहे त्यांच्याबरोबर आहे. मला काय मिळाले यापेक्षा महाराष्ट्रातील जनतेला काय मिळणार हे महत्त्वाचे आहे, असे एकनाथ शिंदे यांनी म्हंटले आहे.

### काही खात्यांवरून तिन्ही पक्षात वाद

## एक दोन दिवसात खातेवाटप होईल मंत्री गुलाबराव पाटलांनी केले स्पष्ट

**नागपूर (वृत्तसंस्था)–**राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले त्यानंतर मंत्रिमंडळ विस्तार देखील झाला. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री बनले तर अजित पवार आणि एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री तसेच अनेक आमदारांना मंत्रिपद देखील मिळाले. मात्र, सध्या खातेवाटप कधी होणार हा प्रश्न अनेकांना पडला आहे. खातेवाटप रखडल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू असून विरोधक देखील यावरून टीका करत आहेत. यावर आता शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.




गुलाबराव पाटील म्हणाले, खाते मिळणार आहेत, मात्र शपथ घेतल्यानंतर आता आपले मंत्रिपदाचे काम सुरू झाले आहे. पुढील एक ते दोन दिवसांत खाते वाटप जाहीर होईल. खाते वाटपला विलंब झालेला नाही. पण एक दोन खात्यांबद्दल तिघांमध्ये वाद आहे. तिघे एकत्र बसतील आणि चर्चा करतील. त्यानंतर एक दोन दिवसांत खात्यांचे वाटप होईल, असे गुलाबराव पाटील यांनी सांगितले आहे.पुढे बोलताना गुलाबराव पाटील म्हणाले, कुठलेही खाते मिळाले तरी शेवटी खाते हे खाते असते. कॅबिनेट मंत्री होणे एवढे सोपे नाही. पाच वर्षांचा काळ काढल्यानंतर पुन्हा कॅबिनेट मंत्रिपद भेटले आहे. मला वाटते दुसऱ्यांदा कॅबिनेट मंत्रिपद भेटणे ही जळगाव जिल्ह्यातील पहिलीच घटना आहे.पालकमंत्री असो किंवा कोणते खाते मी मूठल्याही गोष्टीसाठी डिमांड केलेली नाही. नेत्यांनी माझ्यावर विश्वास टाकला आहे. त्या विश्वासाला खरा उतरण्याचा मी प्रयत्न करेल, असे गुलाबराव पाटील म्हणाले आहेत. यावेळी बोलताना गुलाबराव पाटील यांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी देखील प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, जि घटना घडली ती निश्चितपणे निषेधार्ह आहे. सभागृहात सुरेश धस यांनी यासंदर्भात निवृत्त न्यायाधीश किंवा सध्याचे न्यायाधीशांच्या मार्फत चौकशीची मागणी केली आहे. चौकशीत जे निष्पन्न होईल त्यात कोणालाही सोडले जाणार नाही.

### कल्याणमधील मराठी माणसाला झालेली मारहाण संतापजनक

## शुक्ला नावाचे पार्सल परत पाठवा;महाराष्ट्र द्रोहाचा गुन्हा दाखल करा– आदित्य ठाकरे

**नागपूर (वृत्तसंस्था)–**कल्याणमध्ये मराठी कुटुंबाला मारहाण करण्यात आली ती दुर्दैवी नाही तर संतापजनक आहे. महाराष्ट्रात मराठी–अमराठी, जाती–जातीचा जो वाद सुरू आहे, त्याला महायुतीचे सरकारच्या काळात वाढले आहे, असा आरोप ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केला आहे.आदित्य ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, मराठी माणसांना सोसायटीमध्ये घरे दिली जात नाही. मुंबईही महाराष्ट्राची राजधानी आहे, आणि मग देशाची आर्थिक राजधानी. राज्यातील प्रत्येक जिल्हा हा मराठी माणसांचा आहे. आमच्या राज्यात वेगवेगळ्या राज्यातील लोकं राहत आहेत. पण जर आम्हाला कुणी माज दाखवला तर मराठी तरुणांनी त्याला न्याय दिला तर पोलिसांनीमध्ये येऊ नये.

आदित्य ठाकरे म्हणाले की, कल्याणमधील



मराठी माणसावर हत्याराने हल्ला करण्यात आला. कोण तो शुक्ला की कोण त्यांचे तोंड कुणी सुजवले, हातपाय तोंडले तर पोलिसांनीमध्ये येऊ नये. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागणी करतो की त्याला एमटीडीसीमधून बडतर्फ करत हे पार्सल जिथून आला तिथे त्याला परत पाठवून द्या.

आदित्य ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्रात भाजपचे सरकार येण्यापूर्वी असा वाद कधीच झाला नाही. अनेक भाषिक लोकं महाराष्ट्रात गेली अनेक वर्षे राहत आहेत पण असा प्रकार कधीच झाला नाही. गेली २ अडीच वर्षे शिंदे– फडणवीस यांच्या सरकारच्या काळात हे प्रकार वाढल्याचा आरोप आदित्य ठाकरेंनी केला आहे.आदित्य ठाकरे म्हणाले की, आमच्या परंपरेत मास मच्छी खातो, कुणी व्हेज सोसायटी करण्याचा प्रयत्न केला किंवा मराठी माणसाला घरे देण्यास नकार दिला तर त्या सोसायटीची ओसी रद्द केली पाहिजे. जर कुणी मराठी माणसाला दाबण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर महाराष्ट्र द्रोहाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. जर कुणी दादागिरी करत असेल तर पोलिसांनी त्याला दांडा काय आहे, हे दाखविले पाहिजे.

## कितीही मोठ्या बापाचा असला तरी कारवाई करणारच:‘कल्याण मारहाण’प्रकरणात अजित पवार यांनी मांडली रोखठोक भूमिका

**नागपूर (वृत्तसंस्था)–**कल्याणच्या योगीधाम सोसायटीत मराठी माणसावर झालेली मारहाण आणि अन्यायाच्या घटनेची गंभीर दखल घेत महाराष्ट्र हा ‘शिव–शाहू–फुले आंबेडकरां’चा आहे. इथे कुणी मराठी माणसावर अन्याय करत असेल तर ते चालणार नाही. सभागृहात मांडण्यात आलेली माहिती तपासून मराठी माणसावर अन्याय करणारा ‘तो’ अधिकारी कितीही मोठ्या बापाचा असला, तरी त्याची गय केली जाणार नाही. त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल. या कारवाईच्या माध्यमातून महाराष्ट्रातल्या प्रत्येक मराठी माणसाचा ‘मान–सन्मान’ राज्यात ठेवला जाईल, अशा कठोर आणि रोखठोक शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार विधानसभेत राज्य सरकारची भूमिका मांडली.

या वेळी अजित पवार यांनी राज्यातल्या जनतेला आश्वस्त करत, या प्रकरणी तातडीने कारवाई करावी, असे आदेश देण्यात येतील, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार सभागृहात सांगितले. विरोधी पक्षाच्या वतीने हा



मुद्दा सभागृहात मांडण्यात आला. ठाकरे गटाचे सुनील प्रभू यांनी या संबंधीचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर अजित पवार यांनी त्याला उत्तर दिले आहे.कल्याण येथील योगीधाम सोसायटीत मराठी माणसाला मारहाण आणि अन्याची बाब ‘पॉईंट ऑफ इन्फॉरमेशन’च्या माध्यमातून आमदार सुनील प्रभू यांनी विधानसभेत मांडली. त्यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, या सभागृहाचे सदस्य सुनील प्रभूं यांनी महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. हा महाराष्ट्र ‘शिव–शाहू–फुले आंबेडकरां’चा महाराष्ट्र आहे. इथे कुणी मराठी माणसावर अन्याय करत असेल तर ते चालणार नाही. सभागृहात देण्यात आलेली माहिती तातडीने तपासून मराठी माणसावर अन्याय करणारा ‘तो’ अधिकारी कितीही मोठ्या बापाचा असला, तरी त्याची गय केली जाणार नाही. त्याच्यावर कडक कारवाई केली जाईल. या कारवाईच्या माध्यमातून महाराष्ट्रातल्या प्रत्येक मराठी माणसाचा मान–सन्मान राज्यात ठेवला जाईल, अशाच पद्धतीने प्रशासन वागेल, याची खात्री मी सभागृहाला देतो. त्यावर याप्रकरणी तातडीने कारवाई करण्याचे आदेशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात दिले.

## मराठी माणूस दिल्लीपर्यंत गेला होता अन् पुन्हा कधीही जाऊ शकतो,कंट्रोलमध्ये रहा

**नागपूर (वृत्तसंस्था)–**मराठी माणसाचे मन मोठ आहे, म्हणून आम्ही त्यांना परवानगी देतो. महाराष्ट्रात येऊन जर मराठी भाषा अन् माणसांबद्दल काही बोलले तर कधी कधी रक्त सळसळते, पण संविधानुसार वागावे लागते, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी मुंबईतील मराठी माणसाला झालेल्या मारहाणीवर बोलताना म्हटले आहे.



दरम्यान रोहित पवार म्हणाले की, सरकारने या बाबतीत काळजी घ्यायला हवी. माझे लोकांना आणि कार्यकर्त्यांने सांगणे आहे की मारामारी करुन जमणार नाही. पण बाहेरुन आलेल्यांनी हे लक्षात ठेवायले हवे की मराठी माणूस दिल्लीपर्यंत गेला होता आणि पुन्हा कधीही जाऊ शकतो, तुम्ही कंट्रोलमध्ये रहावे, असा इशारा रोहित पवार यांनी दिला आहे.रोहित पवार म्हणाले की, केंद्रातून महाराष्ट्र भाजपला जर साडेपाचशे कोटी रुपये सोशल मिडीयाच्या प्रचारासाठी येत आहे असे त्यांचेच प्रमुख लोकं बोलत असतील तर फेक नरेटीव्ह त्यांचेच लोकं पसरवत आहेत. विधानसभेला सत्तेत येण्यासाठी त्यांनी समाजा–समाजामध्ये वाद लावले. आता पुढेचे ५ वर्षे आमचे हे काम असणार आहे की जाती–जातीमध्ये निर्माण झालेली तेढ कमी करायची आणि पुन्हा एकोपा निर्माण करायचा.रोहित पवार म्हणाले की, शिव–शाहू–फुले यांच्यासह डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा महाराष्ट्र आहे, हा संताचा महाराष्ट्र आहे, आता पुन्हा राज्यात तसे वातावरण निर्माण करण्याची गरज आहे.रोहित पवार म्हणाले की, भाजपची २०२९ ची तयारी सुरू झाली आहे. हिंदूराष्ट्र म्हणत ते कामाला लागले आहेत. विकासावर चर्चा न करता वेगळ्याच दिशेने महाराष्ट्र चालला आहे. लोकांनी यावर विचार केला पाहिजे.हे राज्याच्या हिताचे नाही, असेही त्यांनी यावेळी म्हटले आहे.

### एकनाथ शिंदेंना भेटल्यावर बदलला सूर

# एकनाथ शिंदेंचा विश्वासू सहकारी हे पद मला जवळचे–विजय शिवतारे

**नागपूर (वृत्तसंस्था)–**महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका झाल्या आणि यात महायुतीने प्रचंड बहुमत मिळवत सत्ता स्थापन केली. मंत्रिमंडळ विस्तार देखील झाला, मात्र, यात महायुतीमधील तिन्ही पक्षातील काही आमदार नाराज असल्याचे समोर आले आहे. मंत्रिपद न मिळाल्याने ही नाराजी आहे. यात शिवसेना शिंदे गटातील अनेक आमदारांनी उघडपणे आपली नाराजी व्यक्त देखील केली. यात आमदार विजय शिवतारे यांनी परखड भाषेत नाराजी व्यक्त केली होती. मात्र, आता त्यांचा सूर काहीसा बदलला असल्याचे दिसत आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर आमदार विजय शिवतारे यांनी आपली भूमिका बदलली असल्याचे दिसत आहे. विजय शिवतारे म्हणाले, मी नाराज नव्हतो. एकनाथ शिंदे यांचा विश्वासू सहकारी हे पद मला जास्त जवळचे आहे, असे म्हणत त्यांनी आपला नाराजीचा सूर बदलला असल्याचे स्पष्ट दिसत आहे.नागपूर येथे सुरू असलेले विधिमंडळ अधिवेशन सोडून विजय शिवतारे हे त्यांच्या मतदारसंघात निघून गेले होते. यावर बोलताना शिवतारे म्हणाले, मी विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोडून आलो करण दोन तीन दिवसात जे काही झाले त्यामुळे माझा जरा मूड गेला होता. पात्रता असताना देखील डावलले गेले, डावलण्यामागे एकनाथ शिंदे यांची कारणे असतील. मला मंत्रिपद का नाकारले मला माहीत नाही. मंत्रिपद मिळेल म्हणून कुटुंबातील सगळे लोक नागपुरात आले. एखादा माणूस निधन झाल्यावर जसा मातंग होतो तसा मातंग झाला, त्यामुळे मी अस्वस्थ होतो. कार्यकर्ते गाड्या घेऊन आले होते, त्यांचा अपेक्षाभंग झाला. कॅपिसिटी होती म्हणून वाटत होते मंत्रिपद मिळेल, पण तसे झाले नाही. मंत्री पद मिळणार नाही हे दोन दिवसापूर्वी मला सांगितले असते तर शांत राहिलो असतो, उलट मी थांबून दुसऱ्याला मंत्रिपद दिले असते.पुढे बोलताना विजय शिवतारे म्हणाले, मला मंत्रिपद मिळेल, अशी माझ्या घरच्यांना अपेक्षा होती. शपथविधी सोहळ्यासाठी ३७५ गाड्या तब्बल दहा तासांचा प्रवास करून नागपूरला आल्या होत्या, कार्यकर्ते देखील खूपच आग्रही होते. मात्र, मंत्रिपदाची संधी न मिळाल्याने दुसऱ्या दिवशी मी थोडा भावूक झालो आणि अनेक गोष्टी बोलून गेलो. पण माझ्या मनात असे काही नाही, पुढील काळात एकनाथ शिंदे जे पद देतील ते मला मान्य असेल, असे म्हणत विजय शिवतारे यांनी आपली नाराजी दूर झाली असल्याचे स्पष्ट केले आहे.



# भा.ज.प.युवा नेता अमर बोडलावार यांचा वाढदिवस कार्यकर्त्यांकडून उत्साहात साजरा

## रक्तदान शिबिरात सहभाग, समाजासाठी उत्तम संदेश देणारे नेतृत्व

**मूल । प्रतिनिधी**

श्री संत परमहंस कोंडय्या महाराज संस्थान धाबा अध्यक्ष, व्यापारी आघाडीचे अध्यक्ष व माजी जि. प. सदस्य अमर बोडलावार यांचा वाढदिवस कार्यकर्त्यांकडून मोठ्या उत्साहात सेवा दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले, ज्यात बोडलावार यांनी स्वतः रक्तदान करून समाजासाठी एक उत्तम संदेश दिला.

धाबा नगरीत लेझीम पथक आणि ढोल ताशांच्या गजरात, आतिशबाजीसह बोडलावार यांचे जंगी स्वागत करण्यात आले. सर्वप्रथम कोंडय्या महाराजांचे अभिषेक करून जनतेच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली गेली. यानंतर रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

वाढदिवसानिमित्त आयोजित 'सर्वश्रेष्ठ रक्तदान' संकल्पनेतून रक्तदान शिबिर घेतले गेले. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक दात्याला १५ लाख रुपयांपर्यंत विमा प्रदान करण्यात आला. याशिवाय मोफत नेत्र तपासणी, चष्मेवाटप, मोतीबिंदूसाठी शस्त्रक्रिया आणि बीपी व शूगर तपासणी देखील करण्यात आली.

चंद्रपूर जिल्ह्याचे आ.सूधीर मुनगंटीवार यांच्या सहकार्याने, तसेच राजूरा विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात, या शिबिराचा लाभ आर्थिक दुर्बल घटकांना देण्यात आला.

गोंडपिपरी शहरात भाजपा कार्यकर्ता प्रविन बिरेवार यांनी मसाला भात व मठ्ठा वाटप केले.

भंगाराम तळोधीतील युवा कार्यकर्त्यांनी देखील आपल्या लाडक्या नेत्याचे स्वागत ढोल ताशा व आतिशबाजी करत रॅली काढून केला. केक कापल्यानंतर गावकऱ्यांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आणि त्यांच्या दीर्घायुष्यासाठी कामना केली.

आयोजकांनी गावकऱ्यांसाठी मेजवानी दिली.

या कार्यक्रमात ईंद्रपाल धूडसे (सभापती बाजार समिती गोंडपिपरी), स्वप्नील अनमूलवार (उपसभापती बाजार समिती गोंडपिपरी), दिपक सातपुते (भा.ज.प. तालुका अध्यक्ष गोंडपिपरी), बबन निकोडे, चेतन गौर, निलेश पूलगमकर, राकेश पून, अरूण कोडापे, मारोती अम्मावार, नंदाताई घोगरे (सरपंच धाबा), लक्ष्मीताई बालूगवार (सरपंच भंगाराम तळोधी), हिराचंद कंदीकूरवार, सूरेंद्र घाबर्डे, किशोर अगस्ती आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते



# मूल शहरातील समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरपरिषदेस निवेदन

## समस्या सोडविण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी तातडीने पाऊल उचलावे-आकाश येसनकर

**मूल । प्रतिनिधी**

वॉर्ड क्रमांक १५ आणि १६ मधील नागरी समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने नगरपरिषदेकडे निवेदन सादर केले आहे. पाणी, वीज आणि प्रकाश व्यवस्थेसारख्या मूलभूत सुविधांच्या अभावामुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींवर तातडीने उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



हनुमान मंदिराजवळील सार्वजनिक संडास अनेकांसाठी आवश्यक आहे, मात्र तेथे पाणी व वीज उपलब्ध नसल्यामुळे ते वापरणे कठीण झाले आहे. याशिवाय अस्वच्छतेमुळे आरोग्यविषयक समस्या उद्भवण्याची शक्यता वाढली आहे. या ठिकाणी त्वरित पाणी व वीजपुरवठा सुरळीत करून स्वच्छता व्यवस्था सुधारण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

बाल विकास शाळा परिसरात प्रकाश व्यवस्थेचा अभाव आहे, ज्यामुळे विद्यार्थी आणि नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसर प्रकाशमान करण्यासाठी सौर उर्जेवर आधारित पथदिवे बसवण्याचा पर्यावरणपूरक प्रस्ताव राष्ट्रवादी काँग्रेसने सादर केला आहे.

शहराध्यक्ष आकाश येसनकर यांनी सांगितले की, नागरिकांच्या आरोग्य आणि सुरक्षेसाठी या समस्या तातडीने सोडविणे अत्यावश्यक आहे. मुख्याधिकाऱ्यांनी यावर तत्काळ पावले उचलावीत. अन्यथा आम्हाला तीव्र आंदोलन करावे लागेल.

निवेदन सादर करताना राहुल बघमारे, मायाबाई टेकाम, जयश्री सोयाम, अनुसया कोडापे, काजल गाजेवार, गणूबाई मट्टे, शालू मडावी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# महापुरुषांचा अपमान भाजपची फॅशन काँग्रेसकडून निषेध आंदोलनात संतप्त प्रतिक्रिय

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अपमानावर काँग्रेसचा ठाम विरोध

**भंडारा । प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या संसदेत केलेल्या विधानामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान झाल्याचा आरोप काँग्रेस पक्षाने करत भंडारा येथे त्रिमूर्ती चौकात जोरदार निषेध आंदोलन केले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आ. नानाभाऊ पटोले यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष मोहन पंचभाई यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

भंडारा येथील विश्राम भवन परिसरातून त्रिमूर्ती चौकापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो हातात घेऊन काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी आक्रमक पद्धतीने आंदोलन केले. बाबासाहेब का ये अपमान नहीं सहेगा हिंदुस्थान आणि जय भीम च्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.




निवडणुकीपूर्वी आणि नंतर महापुरुषांचे नाव बदलणे ही भाजपची फॅशन बनली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समतेचा स्वर्ग निर्माण केला. त्यामुळे त्यांच्या अपमानाचा विरोध करणे हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे, असे जिल्हाध्यक्ष मोहन पंचभाई यांनी सांगितले.

भाजपकडून डॉ. आंबेडकर यांचा अपमान म्हणजे संविधान व सामान्य जनतेचाही अपमान आहे. यावर केंद्रीय सत्तेत सहभागी मित्रपक्षांनी देखील रस्त्यावर उतरून निषेध नोंदवावा, अशी मागणी यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केली.

यावेळी मोहन पंचभाई, जयश्री बोरकर, धनराज साठवणे, पूजा ठवकर, अँड. शफी लद्दानी, धनंजय तिरपुडे, पवन वंजारी, विनीत देशपांडे, मनोज बागडे यांसह काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. काँग्रेस पक्षाने महापुरुषांचा अपमान सहन न करण्याचा निर्धार व्यक्त केला असून, भाजपच्या धोरणांचा प्रखर विरोध करण्यासाठी पुढील आंदोलनात्मक भूमिका घेण्याचे संकेत दिले आहेत

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या गटस्तरीय बालनाट्य स्पर्धा संपन्न



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या नागपूर विभागाअंतर्गत चंद्रपूर गट कार्यालयात ललित कला भवन, बंगाली कॅम्प येथे १७ डिसेंबर २०२४ रोजी गटस्तरीय बालनाट्य स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत तिन्ही जिल्ह्यांतील नऊ संघांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेचे उद्घाटन परीक्षक सागर मुने, चैताली कटलावार, जगदीश नंदुरकर आणि कामगार कल्याण अधिकारी रामेश्वर अळणे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शन कल्याण आयुक्त रविराज ईळवे आणि उपकल्याण आयुक्त नंदलाल राठोड यांनी केले.

स्पर्धेत कामगार कल्याण केंद्र गडचिरोलीने प्रथम क्रमांक, हिंगणघाटने द्वितीय, तर वर्धाने तृतीय क्रमांक मिळवला. उत्कृष्ट अभिनयासाठी सात्विक शिंदे, नंदिनी गुंडेवार, तसेच उत्कृष्ट दिग्दर्शनासाठी सुनीता सूर्यवंशी यांना पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक वितरण सोहळ्याचे अध्यक्षस्थान डॉ. आनंदराव अडबाले यांनी भूषवले, तर प्रमुख पाहुणे म्हणून देवराव कोंडेकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामेश्वर अळणे यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार किरण उपरे यांनी मानले.

# वामनदादा कर्डक यांच्या समग्र साहित्यात राष्ट्रवाद दिसतो-ज्येष्ठ विचारवंत डॉ.रविचंद्र हडसनकर

**गडचिरोली । प्रतिनिधी**

लोकशाहीर वामनदादा कर्डक यांनी आपल्या गीतांद्वारे आंबेडकरी चळवळीला मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या साहित्यातून राष्ट्रवादाचे दर्शन होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत आणि साहित्यिक प्रा. डॉ. रविचंद्र हडसनकर यांनी केले.

गोंडवाना विद्यापीठात लोककवी वामनदादा कर्डक अध्यासनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे यांनी भूषवले. यावेळी कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, अध्यासन प्रस्तावक डॉ. दिलीप चौधरी, सदस्य डॉ. सागर जाधव, डॉ. इसादास भडके, डॉ. केशव मेंढे, अनिरुद्ध वनकर, आणि समन्वयक प्रा. रोहित कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.



हडसनकर म्हणाले, वामनदादा कर्डक यांनी माणसाच्या हितासाठी गीतलेखन केले आणि आंबेडकरी चळवळीत नवा चैतन्य निर्माण केला. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार घराघरांत पोहोचवण्याचे काम त्यांनी समर्थपणे केले. डॉ. श्रीराम कावळे यांनी सांगितले की अक्षरांची ओळख नसतानाही वामनदादांनी डॉ. आंबेडकर यांच्यावर दहा हजारांहून अधिक गीतांची रचना करून चळवळीला बळ दिले. त्यांच्या साहित्याचा अभ्यास जागतिक पातळीवर पोहोचवण्याचा प्रयत्न अध्यासनाद्वारे व्हायला हवा. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिलीप चौधरी यांनी केले. स्वागत प्रा. रोहित कांबळे यांनी तर आभार डॉ. अनिल हिरेखण यांनी मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. हेमराज निखाडे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. चैतन्य शिनखेडे, प्रा. अमोल चव्हाण, श्रीरंग कावळे आणि निता कन्नाके यांनी केले. विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी, आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांतर्गत बेला ग्रामपंचायत देशात प्रथम

# गावाच्या मेहनतीला सलाम;कार्बन न्यूट्रल तत्त्वाचा यशस्वी अवलब

**भंडारा । प्रतिनिधी**

भंडारा जिल्ह्यातील बेला ग्रामपंचायतीने राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२४ अंतर्गत देशात प्रथम क्रमांकाचे कार्बन न्यूट्रल विशेष पुरस्कार पटकावले आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या भव्य सोहळ्यात भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



सरपंच शारदा गायधणे यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीने सौरऊर्जेचा वापर, वृक्षारोपण, जलसंवर्धन, आणि घनकचरा व्यवस्थापनाच्या माध्यमातून गावाला कार्बन न्यूट्रल बनवले. गावकऱ्यांची मेहनत आणि जोरावर हा परिवर्तनाचा प्रवास शक्य झाला. विशेष म्हणजे, सरपंच शारदा गायधणे यांच्या नेतृत्त्वाखाली ग्रामपंचायतीने रात्री उशिरापर्यंत बैठक घेतली आणि कचऱ्याचे वर्गीकरण व स्वच्छता मोहीम राबवली.

या बद्दल बोलताना सरपंच म्हणाल्या, लोक आधी म्हणायचे, हे वेडेपण आहे. डोकं फिरलं आहे का? पण आज तेच लोक आमच्या स्तुती करत आहेत. हा बदल त्यांच्या विचारांना चपराक देणारा आहे.

पुरस्कार सरपंच शारदा गायधणे आणि ग्रामविकास अधिकारी विलास खोब्रागडे यांनी स्वीकारला. या वेळी गटविकास अधिकारी डॉ. संघमित्रा कोल्हे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी उमेश नंदागवळी, उपसरपंच अर्चना प्रकाश कांबळे, तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

गावकऱ्यांच्या कष्टाशिवाय हा यशस्वी प्रवास शक्य झाला नसता. प्रमोद हुमणे, प्रमोद तिडके, सोपान अजबले, पोलीस पाटील आणि ग्रामपंचायतीचे कर्मचारी, तसेच सर्व गावकऱ्यांनी या परिवर्तनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. राष्ट्रीय पंचायत पुरस्कार अंतर्गत मिळालेल्या कोटी रुपयांच्या पारितोषिकामुळे ग्रामपंचायतीच्या भविष्यातील विकासाला बळ मिळणार आहे. आज या यशामुळे बेला ग्रामपंचायतीचे नाव संपूर्ण देशभर गाजत आहे. बेला ग्रामपंचायतीने देशभरातील इतर ग्रामपंचायतींसाठी एक नवा आदर्श निर्माण केला आहे. पर्यावरण रक्षण आणि शाश्वत विकासाच्या दिशेने उचललेले हे पाऊल भविष्यातील प्रेरणादायी ठरणार आहे.

# विधानसभा निवडणूक खर्च तपासणीस प्रारंभ



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत लढलेल्या उमेदवारांच्या अंतिम खर्चाच्या तपासणीला प्रारंभ झाला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निवडणूक खर्च निरीक्षक देवांशी विश्वास, अरुण चौधरी आणि जयंतकुमार यांनी तपासणी प्रक्रिया सुरू केली आहे. उमेदवारांना आपला अंतिम खर्च येत्या २३ डिसेंबरपर्यंत सादर करण्याची परवानगी देण्यात आली आहे. २०२४ विधानसभा निवडणुकीसाठी आयोगाने खर्चाची ४० लाख रुपयांची मर्यादा निश्चित केली होती. जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघांमधून १५१ उमेदवारांनी निवडणूक लढवली होती. अर्ज दाखल केल्याच्या दिवसापासूनच उमेदवारांना खर्चाची नोंद ठेवणे बंधनकारक करण्यात आले होते.

उमेदवारांना खर्चासाठी स्वतंत्र बँक खाते उघडणे अनिवार्य होते, तसेच सर्व खर्च त्या खात्यातूनच करणे बंधनकारक करण्यात आले. प्रचारामध्ये वापरल्या जाणाऱ्या मिरवणुका, सभा, व्यासपीठावरील व्यवस्था, हार, टोप्या, खुर्च्या आदींसाठीचा खर्च आयोगाच्या वतीने चित्रीकरणाद्वारे नोंदवला जात होता.

निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी ही तपासणी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## शिक्षकांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध:आमदार सुधाकर अडबाले

# विविध मागण्यांसाठी हिवाळी अधिवेशनादरम्यान विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे नागपुरात धरणे आंदोलन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सभागृहात मांडून सोडविण्यासाठी पूर्णपणे कटिबद्ध असून, प्रश्नांवर ठोस तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांनी आंदोलनाप्रसंगी दिली. राज्यातील खाजगी व स्थानिक स्वराज्य संस्थाअंतर्गत संचालित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व खाजगी अनुदानित विजाभज / आदिवासी आश्रम शाळेतील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अनेक समस्या शासनदरबारी प्रलंबित आहेत. प्रलंबित समस्या सोडविण्याकरीता विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने माजी आमदार श्री. व्ही. यू. डायगव्हाणे यांच्या मार्गदर्शनात व विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले, अध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वात हिवाळी अधिवेशनादरम्यान यशवंत स्टेडियम, नागपूर येथे १९ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात राज्यातील सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर व राज्य कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेंशन योजना लागू करावी, विना अनुदानित/अंशतः अनुदानित शाळांना प्रचलित धोरणानुसार १००% अनुदान मंजूर करण्यात यावे, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय, दि. १५ मार्च २०२४ यातील संचमान्यतेबाबत जाचक अटी रद्द करण्यात याव्या, राज्यातील अघोषित शाळा व नैसर्गिक वाढीव तुकडयांना अनुदानास पात्र घोषित करून आवश्यक निधीची तरतूद करण्यात यावी, न्यायालयीन आदेशाप्रमाणे नागपूर विभागातील आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करणाऱ्या विजाभज




आश्रमशाळा शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता व एकस्तर वेतनश्रेणी योजनेचे लाभ पूर्ववत सुरू करण्यात यावे, न्यायालयीन आदेशाप्रमानुसार आदिवासी विकास विभागाअंतर्गत आश्रमशाळेतील शिक्षकांना नियुक्ती दिनांकापासून विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आलेल्या ११५५ शिक्षकांना मानधन वेतनाची थकबाकी अदा करण्यात यावी, दत्तक शाळा योजना राबविण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करावा, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा शासन निर्णय दिनांक २३ ऑगष्ट २०२४ नुसार शिक्षकांची अशैक्षणिक कामांतून मुक्तता करण्यात यावी. तसेच सदर शासन निर्णयाची अमंलबजावणी करण्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात यावे यासह अन्य मागण्यांचा समावेश आहे.

या धरणे आंदोलनात विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय पदाधिकारी, जिल्हा, तालुका पदाधिकारी व विदर्भातील विविध विभागाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सदर आंदोलनातील मागण्यांचे निवेदन मंत्री अतुल सावे यांना प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे यांनी विधानभवनात दिले


# नायगाव तालुक्यात अवैध रेती तस्करी जोमात

## तहसीलदारांसह महसूल प्रशासन कोमात

**नांदेड । प्रतिनिधी**

बालाजी पाटील नायगाव तालुक्यातील राहेर, मेळगाव येथील नदीपात्रातून बोटींच्या साह्याने दिवसा व रात्रीच्या वेळेस हजारो ब्रास रेती तस्करी होत आहे. परंतु याकडे नायगाव तहसीलदारांसह महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडत असल्याची चर्चा होत आहे.

नायगाव तालुक्यातील राहेर मेळगावसह बरबडा परिसरातील गोदावरी नदीच्या पात्रातून रात्रंदिवस अवैध रेती उपसा सुरू आहे. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास तर होतच आहे परंतु शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडत आहे. टाकळी, बरबडा, आंतरगाव येथे अवैध रेती उपसा केला जात असून याकडे मात्र स्थानिक तहसीलदार, महसूल विभागाचे मंडळ अधिकारी व तलाठी बघ्याची भूमिका घेत असल्याने त्यांचे रेती माफीयांसी लागेबांधे आहेत की काय असा प्रश्न निर्माण होत आहे. गोदावरी नदी पात्रातून मशिनच्या सहायाने



रेती माफिया राजरोसपणे अवैध रेती उपसा करीत आहेत. यामुळे स्थानिक महसूल यंत्रणा अस्तित्वात आहे की नाही ? की त्यांनी चिरीमिरी घेऊन साठे लोटे केले आहे ? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

रेती माफिया स्थानिक तहसीलदार, महसूल विभागाचे मंडळ अधिकारी व तलाठी यांचे हात ओले करून गंगेच्या पाण्यातून अवैध रेती उपसा केला जात आहे. याकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी पुरोगामी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच अवैध रेती उपसा वेळीच थांबत नसेल तर आंदोलन छेडण्याचा इशारा एका निवेदनाद्वारे दिला आहे.

# इंदापूर तालुका हिंदी अध्यापक संघाची नियोजन बैठक संपन्न



**इंदापूर । प्रतिनिधी**

इंदापूर तालुका हिंदी अध्यापक संघाच्या स्थापनेनंतर संघाची पहिली नियोजन बैठक निमगाव येथील केतकेश्वर विद्यालयात पार पडली. या बैठकीत तालुकास्तरीय हिंदी निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांचे नियोजन करण्यात आले. या स्पर्धा तीन गटांमध्ये आयोजित करण्याचे ठरविण्यात आले असून, तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय, संघाच्या वतीने सेवानिवृत्त हिंदी अध्यापकांचा सन्मान आणि आदर्श हिंदी अध्यापक म्हणून सहा पुरस्कार देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. बक्षीस वितरण सोहळा निमगाव येथे आयोजित केला जाणार आहे.

या बैठकीत संघाचे अध्यक्ष शत्रुघ्न कानगुडे, उपाध्यक्षा स्वप्नाली गायकवाड, राज्य हिंदी अध्यापक संघाचे सदस्य उस्मान मुलाणी, तसेच रमेश मचाले, चंद्रकांत सोळसे, सुधाकर भोंग, प्रकाश शेंडे, विलास गाढवे, राजेंद्र रणमोडे, दीपक निंबाळकर, दत्तात्रय वाघ, दीपक वडापुरे, दत्तात्रय गवळी आणि किसन भोंग उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन किसन भोंग यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपाध्यक्षा स्वप्नाली गायकवाड यांनी केले. हिंदी अध्यापक संघाच्या या उपक्रमामुळे इंदापूर तालुक्यातील हिंदी शिक्षणाला नवा गतीमान कार्यक्रम मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# सरोदस्वरांनी प्राध्यापक झाले मंत्रमुग्ध!



**गडचिरोली । प्रतिनिधी**

आदिवासी गौरव यात्रेमध्ये सहभागी झालेले सर्व प्राध्यापक सरोदवादक विजया रोहित कांबळे यांच्या सरोद स्वरांनी मंत्रमुग्ध झाले. महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी व गोंडवाना विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने प्राध्यापकांसाठी आदिवासी गौरव यात्रा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक सहभागी झाले आहेत. विजया कांबळे यांनी सरोद वादनातून भावगीते, भक्तिगीते, गझल व विविध रागांचे सादरीकरण केले. अभिजित राठोड यांनी तबला साथ केली. आदिवासी गौरव यात्रेच्या समन्वयक डॉ. प्रिया गेडाम यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले

# बाल विकास प्रकल्प आधार नोंदणी केंद्रांचे खासगीकरण नाही





**अहिल्यानगर :प्रतिनिधी**

महिला व बाल विकास विभागाच्या अखत्यारित असलेल्या बाल विकास प्रकल्प कार्यालयात आधार नोंदणी केंद्रांसाठी रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या संस्थेचे फक्त मनुष्यबळ घेण्यात आले असून या केंद्रांचे खासगीकरण करण्यात आले नसल्याचा खुलासा जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे यांनी केला आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील लाभार्थ्यांची आधार नोंदणी जलद आणि प्रभावी करण्यासाठी २०२१ मध्ये राज्यात १ हजार ६५९ आधार नोंदणी संच उपलब्ध करून दिले आहेत.

रेलटेल कॉर्पोरेशनच्या मनुष्यबळामार्फत पुढील दोन वर्षांपर्यंत लाभार्थ्यांची आधार नोंदणी करण्यात येणार आहे. महिला व बाल विकास विभागाच्या मालकीचे आधार नोंदणी संच वापरून आणि महिला व बालविकास विभागाच्या एनरोलमेंट एजन्सी कोड वापरूनच अंगणवाडी क्षेत्रातील लाभार्थ्यांना ही सेवा देण्यात येईल. या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचे खाजगीकरण करण्यात आलेले नसल्याचे महिला व बालविकास विभागाने स्पष्ट केले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर बॅरिकेट बसवा

## रिपाईची आयुक्तांकडे मागणी



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शहरातील मार्केटयार्ड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याशेजारी बॅरिकेट बसवावे, अशी मागणी रिपाई आंबेडकर पक्षाचे रोहित आव्हाड यांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे केली आहे. यावेळी बौद्धचार्य संजय कांबळे, भीमसैनिक जिवा कांबळे, आरपीआय आठवले गटाचे अविनाश भोसले आदीसह अन्यथा समस्त आंबेडकर समाज बांधव उपस्थित होते. बॅरेकेट न बसविल्यास आंदोलन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. अनेक वर्षापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याची मागणी करण्यात आली होती. त्यासाठी नवीन पुतळा उभारण्यासाठी सुशोभीकरण करण्यात आले. मात्र त्याला संरक्षण भिंत नसल्याने अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला बॅरीकेट बसविण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

# कृषी महाविद्यालयात रोपवाटीका व्यवस्थापन प्रशिक्षण यशस्वी

**वरोरा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती संचालित आनंद निकेतन कृषी महाविद्यालयात दिनांक १८ ते २० डिसेंबर २०२४ दरम्यान महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ पुणे व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने फळे व भाजीपाला रोपवाटीका व्यवस्थापनावर आधारित निवासी शेतकरी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.

उद्घाटन कार्यक्रम प्राचार्य डॉ. सुहास पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. प्रमुख उपस्थितीत सूचित लाकडे (विषय विशेषज्ञ, कृषी विज्ञान केंद्र गडचिरोली) व मिली पुसदेकर (सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या) होत्या. या प्रशिक्षणात चंद्रपूर जिल्ह्यातील २६ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. सदर प्रशिक्षणामध्ये रोपवाटीका व्यवसायातील संधी व आव्हाने, रोपवाटिकेतील माध्यमे व निर्जंतुकीकरण, फळे व भाजीपाला पिकांचे व्यवस्थापन, पीक संरक्षण, पोषण व्यवस्थापन,






शासकीय योजना व आर्थिक ताळेबंद या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय, प्रात्यक्षिकांमध्ये वाफे तयार करणे, प्रो ट्रे रोपवाटीका तयार करणे, आंबा व पेरु यांसारख्या फळपिकांचे कलम तयार करण्याचे प्रात्यक्षिके सहभागी प्रशिक्षणार्थींना दाखविण्यात आली. प्रशिक्षणादरम्यान सूचित लाकडे, डॉ. सुहास पोतदार, डॉ. प्रशांत राखोंडे, डॉ. अनिल भोगावे, डॉ. रविशंकर पारधी, नितीन गजभे, मारुती वरभे यांनी आपले मौल्यवान मार्गदर्शन केले. तीन दिवसीय प्रशिक्षणाचा समारोप प्राचार्य डॉ. सुहास पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली झाला. प्रमुख अतिथी म्हणून राहुल तायडे (कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना) व कार्यक्रम संयोजिका मिली पुसदेकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. अनिल भोगावे यांनी केले. प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणाबद्दल समाधान व्यक्त केले व प्रशिक्षणाचा उपयोग भविष्यात रोपवाटीका व्यवसायाला नवी दिशा देईल, अशी भावना व्यक्त केली.

# नूतन सभापती प्रा.राम शिंदे यांचे आमदार रोहित पवारांनी केले अभिनंदन



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

एरव्ही एकमेकांकडे ढुंकूनही न पाहणारे आमदार रोहित पवार आणि आमदार. प्रा राम शिंदे नागपूर येथे एका कार्यक्रमात एकत्र आले. प्रा. राम शिंदे यांची विधानपरिषद सभागृहाच्या सभापतीपदी निवड झाल्याबद्दल रोहित पवार यांनी हस्तांदोलन करीत हास्य करत फुलांचा गुच्छ देत अभिनंदन केल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या. त्यांच्या या कृतीचे कर्जत-जामखेड मतदारसंघातील नागरिकांनी मात्र कौतुक केले
पवार आणि शिंदेंची राजकारणा पलीकडील या मैत्रीचे दर्शन मतदारसंघासाठी सुखावह ठरले. मागील पंचवार्षिक निवडणुकीपासून आमदार रोहित पवार आणि माजीमंत्री आमदार प्रा. राम शिंदे यांचा राजकीय कडवा संघर्ष महाराष्ट्र राज्याने पाहिला. दोन्ही तुल्यबळ नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्याची एकही संधी सोडत नव्हते. यंदाच्या निवडणुकीत तर दोघांनी आपला राजकीय संघर्ष अधिकच तीव्र केला. प्रचारात एकमेकांची उणी-दुणी काढताना कधी-कधी तर जीभ देखील घसरली गेली. मतमोजणीच्या दिवशी अंतिम क्षणी दोन्ही नेते मतमोजणी कक्षात हजर होते. मात्र, त्यांनी एकमेकांकडे साधे पाहिले देखील नाही. शेवटच्या फेरीपर्यंत कर्जत-जामखेडचा निकाल ताणला गेला. यात रोहित पवार यांनी बाजी मारली. तर अल्प मतांनी राम शिंदेंना दुसऱ्यांदा निसटता पराभव स्वीकारावा लागला.

२०१९ ला चोंडी निवासस्थानी रोहित पवार गेले असता राम शिंदेंनी त्यांना फेटा बांधत शुभेच्छा दिल्या. मात्र, यंदा दोघांनी पण शेजारी-शेजारी असताना साधे विचारपूस देखील केली नाही किंवा अभिनंदन केले नाही. राम शिंदे या निकालावर खुश नव्हते. तर रोहित पवार देखील या अल्प मताधिक्याच्या विजयाने आनंदी दिसले नाही. राज्यात पुन्हा एकदा महायुतीने मोठे यश मिळवत सत्ता कायम राखली. तर रोहित पवारांना मागील अडीच वर्षाप्रमाणे यंदा देखील विरोधी आमदार म्हणून विकासकामे आणावी लागतील. तर राम शिंदे सत्ताधारी आमदार म्हणून कामे करतील. त्यात यंदा मतदारसंघाचे भाग्य आणखी उजळून निघाले गुरुवारी प्रा. राम शिंदे यांची विधानपरिषद सभापती म्हणून बिनविरोध निवड झाली. त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, उपसभापती नीलम गोरे यांनी आसनावर बसवत पदाची सूत्रे बहाल केली. सर्व राजकीय क्षेत्रांतून राम शिंदेंवर शुभेच्छाचा वर्षाव सुरू झाला. मात्र, संध्याकाळी नूतन सभापती राम शिंदेंचे आमदार रोहित पवार यांचे अभिनंदन करतानाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होताच मतदारसंघात या मैत्रीपूर्ण संबंधाची सकारात्मक चर्चा झडताना दिसल्या. या दोन्ही अभ्यासू नेत्यांनी अशीच मैत्रीपूर्ण संबंध कायम राखत मतदारसंघाचा विकास करावा, अशी अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांनी केली.

## आमदार सत्यजीत तांबेंकडून शाळांना साहित्य वितरण



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजीत तांबे यांच्या आमदार निधीतून अकोले तालुक्यातील ९ जिल्हा परिषद शाळांना संगणक संच व १० विद्यालयांना ई-पोडियमचे नुकतेच वितरण करण्यात आले.जिल्हा परिषद शाळा वारंघुशी, पांगरी, तांभोळ, देवठाण, धामणगाव आवारी, धुमाळवाडी, पाचनई, लहित खुर्द, शासकीय आश्रमशाळा पैठण या शाळांना संगणक संच व अगस्ति विद्यालय अकोले, कळसेश्वर विद्यालय कळस, छत्रपती विद्यालय मेहेंदुरी, सर्वोदय विद्यालय राजूर, राजा हरिश्चंद्र विद्यालय शेणित, सह्याद्री विद्यालय ब्राम्हणवाडा, स्वामी विवेकानंद विद्यालय वीरगाव, रामदास हायस्कूल बेलापूर, शासकीय आश्रमशाळा पैठण या विद्यालयांना ई-पोडियमचे वितरण करण्यात आले. ग्रामस्थ व शाळांच्यावतीने किरण बांडे, धामणगाव आवारीचे उपसरपंच गणेश पापळ व धुमाळवाडीच्या पोलीस पाटील प्रणाली धुमाळ यांनी आमदार सत्यजीत तांबे यांचे आभार मानले.अकोले तालुका काँग्रेसचे अध्यक्ष शिवाजी नेहे यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी पोपटराव नाईकवाडी, बाळासाहेब शेटे, आरिफ तांबोळी, रघुनाथ शेणकर, शहराध्यक्ष रामदास धुमाळ, रमेश बोडके, अनिल वैद्य, भाऊसाहेब थोरात, शाहिद फारुकी, एकनाथ सहाणे, तुषार गायकर, बाळासाहेब कांडेकर, संपत कानवडे, निखील जोर्वेकर, डॉ. रवींद्र गोर्डे, गणेश पापळ यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. प्रारंभी शिवाजी नेहे यांनी स्वागत करून या कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट केली.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी जमावबंदी आदेश




**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी २१ डिसेंबर ते ३ जानेवारी २०२५ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे.

सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## दत्त शिरोळ साखर कारखान्याच्या अध्यक्षांची सहकार महर्षी शंकरराव कोल्हे कारखान्यास सदिच्छा भेट



**कोपरगाव । प्रतिनिधी**

दत्त शिरोळ सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष रघुनाथ देवेगौडा पाटील व त्यांच्या शिष्टमंडळाने सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याला नुकतीच सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे व युवानेते विवेक भैय्या कोल्हे यांच्या वतीने संचालक बाळासाहेब वक्ते यांनी पाटील यांचा सत्कार केला.

कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक बाजीराव जी. सुतार यांनी दिलेल्या माहितीनुसार, अध्यक्ष बिपीनदादा व विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण क्षमतेने कारखाना चालविण्यासाठी प्रयत्न सुरू असून, ऊस उत्पादनवाढीसाठी ठोस कृती कार्यक्रम राबविला जात आहे.

सत्कारास उत्तर देताना रघुनाथ देवेगौडा पाटील म्हणाले की, *स्व. शंकरराव कोल्हे* यांनी सहकार क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा कार्यक्षम वापर करून शेतकऱ्यांच्या ऊस उत्पादनात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी साखर कारखानदारीसाठी आदर्श मॉडेल निर्माण केले.

दत्त शिरोळ सहकारी साखर कारखान्याने क्षारपड जमिनींची सुधारणा करून एकरी

## शिक्षणाधिकारी आणि पदवीधर डी.एड., कला, क्रीडा संघातील चर्चा सकारात्मक

### पदवीधर डी.एड.,कला, क्रीडा संघाचे बेमुदत उपोषण मागे



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर जिल्हा परिषदेसमोर दि. १६ डिसेंबर पासून सुरू असलेले बेमुदत उपोषण अखेर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) आणि पदवीधर डी.एड. कला, क्रीडा संघाचे राज्य पदाधिकारी यांची सकारात्मक चर्चा होऊन शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांचे लेखी पत्रानंतर चार दिवसापासून सुरू असलेले उपोषण मागे घेण्यात आले.

जिल्हासचिव विजय विधाते आणि जिल्ह्यातील इतर शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत राज्य कार्यकारणी सदस्य मिलिंद काळपुंड यांचे मार्गदर्शनाखाली बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले होते. प्रलंबित प्रश्नांमध्ये जिल्हाध्यक्ष रंगनाथ मोरे यांची निवड श्रेणीच्या प्रस्तावास मान्यता, विजय विधाते यांच्या शिक्षक पदावरील नियुक्तीस मान्यता, सचिन देशमुख यांच्या मान्यतेचा प्रस्ताव, नरेश साळवे नियुक्ती मान्यता प्रस्ताव, सुनिल अहिरे यांची शिपाई पदावरून शिक्षक पदावर पदोन्नती बाबत, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्था, कृषी विद्यापीठ राहुरी संस्था तसेच जिल्ह्यातील सर्व संस्थांना दि. २४ मार्च २३ च्या अधिसूचनेनुसार शिक्षकांची सेवाजेष्ठता यादी करणे या सर्व मागण्यांच्या संदर्भात शिक्षणाधिकारी व पदवीधर डी.एड. संघाचे राज्यसचिव महादेव माने, कार्याध्यक्ष बाजीराव सुपे तसेच महिला आघाडीच्या राज्यप्रमुख रंजना सपकाळे यांच्यातील सकारात्मक चर्चेतून दिलेल्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या लेखी पत्रानंतर उपोषण मागे घेण्यात आले. उपोषणकर्त्यांच्या बेमुदत उपोषणात राज्य सरचिटणीस सदस्य मिलिंद काळपुंड, प्रकाश आरोटे, विरेश नवले, रंगनाथ मोरे ,राजेंद्र चव्हाण, अरुण शेलार, कमलेश पवार, गोकुळ ठाकूर, शांताराम वाकळे, शिवाजी गोर्डे, नानासाहेब भोर, मिना सदाफुले, अंजली विधाते, कल्पना जिवडे, मनिषा जगदाळे, कैलास घोडके आदी राज्यातील व जिल्ह्यातील संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते

## 'तो' अधिकारी कितीही मोठ्या बापाचा असला तरी त्याची हयगय केली जाणार नाही-अजित पवार

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

कल्याण येथील मराठी कुटुंबाला मारहाण प्रकरण राज्यभर गाजले आहे. कल्याण येथे एका इमारतीमध्ये अखिलेश शुक्ला याने मराठी माणसांना सराईत गुडांना सांगून मारहाण करायला लावली. अखिलेश शुक्ला हा मंत्रालयात अधिकारी आहे. हे प्रकरण चांगलंच तापल्याने त्याचे पडसाद मंत्रालयातही उमटले. शिवसेना ठाकरे गटाचे नेते सुनील प्रभू यांनी या घटनेची सभागृहात माहिती देत कारवाईची मागणी केली. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल अशी खात्री सभागृहात दिली. तर शुक्लावर निलंबनाची कारवाई सुरू झाल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात केली.कल्याण पश्चिमेकडील अजमेरा हाईट्स योगीधाम बिल्डिंगमधील लता कळवीकट्टे आणि अखिलेश शुक्ला यांच्यात धूप लावण्यावरून वाद झाला होता. यावरून अखिलेश शुक्ला हा लता यांना तुम्ही मराठी घाणेरड लोकं आहात, तुमची इमारतीमध्ये राहण्याची लायकी नाही, असं म्हणून हिणवत होता. तेव्हा शेजारी धीरज देशमुख यांनी मध्यस्थी केली तेव्हा शुक्ला यांची पत्नी त्यांना टकल्या म्हणून चिडवू लागली. आमची आईचा मृत्यू झाल्याने आम्ही केस काढलेत,



असं चिडवू नका असं सांगितलं. त्यानंतर तुम्ही फक्त अर्ध तास द्या म्हणून शुक्ला निघून गेला. अखिलेश शुक्ला याने फोन करून सराईत गुंडांना मारहाण करण्यासाठी बोलावलं. शुक्ला गुंडांना घेऊन देशमुख यांच्या घरी गेला त्यांना बाहेर काढत लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. तेव्हा गीता शुक्ला या सगळ्यांना मारून टाका सोडू नका म्हणून असं बोलत होती.हा महाराष्ट्र शिवशाहू फुले आंबेडकरांचा आहे. या महाराष्ट्रामध्ये कोण मराठी माणसावर अन्याय करत असेल आणि आता जी माहिती देण्यात आली ती तपासून तो अधिकारी किती मोठ्याबापाचा असला तरी त्याची हयगय केली जाणार नाही, त्याच्यावर कारवाई केली जाणार नाही. या कारवाईच्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणसाचा मान-सन्मान या राज्यामध्ये ठेवला जाईल अशा पद्धतीने प्रशासन वागेल याबद्दलची खात्र मी सभागृहाला देतो. त्या अधिकाऱ्याव तत्परतने कारवाई करण्याचे आदेश दिले जातील असं अजित पवार म्हणाले अखिलेश शुक्ला आणि त्याच्या पत्नीने मराठी माणसाला अपमानित होईल असा उल्लेख केला आणि त्यातून संतापाची लाट लोकांमध्ये निर्माण झाली आहे. एमटीडीसी मधे काम करणारा शुक्ला हा व्यक्ती आहे. त्याच्या पत्नीवर देखील गुन्हा दाखल केला आहे. त्याच्यावर निलंबनाची कारवाई सुरू झाल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात केली.

## सौर ऊर्जेच्या वापराबाबत जनजागृती गरजेची-यशवंत डांगे



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

कोळशासारख्या पारंपरिक ऊर्जा स्रोतांचे साठे मर्यादीत असल्याने भविष्यात ऊर्जेच्या शाश्वत पर्यायांकडे वळावे लागणार असून त्यादृष्टीने सौर ऊर्जेच्या वापराबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्ताने आयोजित जनजागृती रॅलीच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, महावितरणचे प्रभारी अधीक्षक अभियंता लक्ष्मण काकडे, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, अतिरिक्त कार्यकारी अभियंता भाऊसाहेब कुमावत, स्वप्नील उल्हे, महाऊर्जाचे आ.ठाणगे, इलेक्ट्रीक इंजिनिअरींग कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष उमेश रेखे, ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनचे जिल्हा अध्यक्ष अमित काळे आदी उपस्थित होते.

## अमित शहा यांच्या वक्तव्याचा गंगाखेड येथे निषेध



**गंगाखेड । प्रतिनिधी**

गंगाखेडमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल अपशब्द वापरल्यामुळे अमित शहा यांचा निषेध करण्यात आला. गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यसभेच्या सभागृहात डॉ. आंबेडकरांच्या नावाचा अपमान केला आणि आंबेडकर हे फॅशन बनले आहे, असे वक्तव्य केले. यावर आंबेडकरी अनुयायांची भावना दुखावली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ मध्ये बौद्ध धम्म दिक्षा देऊन आमच्या जीवनाच्या मार्गाला दिशा दिली, त्यांनीच विज्ञानाची दारे खुली केली. त्यांचा अपमान सहन करणे आमच्या पिढीसाठी अशक्य आहे. गृहमंत्री अमित शहा यांच्या या वक्तव्यामुळे देशभरातील आंबेडकरी समाजात तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

निवेदनात म्हटले आहे की, अमित शहा यांनी देशाची माफी मागावी, अन्यथा आम्ही उग्र आंदोलन सुरू करू. भारतीय जनता पार्टीचे अमित शहा यांच्याच जबाबदारीवर या आंदोलनाचा परिणाम होईल.

निवेदन देताना उपस्थित असलेल्यांमध्ये प्रविण रमेश घोबाळे, रणधीर भालेराव, अशोक घोबाळे, अमोल ढाकणे, दिगंबर घोबाळे, अ‍ॅड. लिंबाजी घोबाळे, बालासाहेब साळवे, मनोहर व्हावळे, भिमराम कांबळे, राहुल गायकवाड, विकास रोडे, श्रीकांत गायकवाड, सुमित कामत, माउली साळवे, गुणवत कांबळे, आशोक द्रावळे, रमेश जोंधळे, प्रा. अतिश खंदारे इत्यादी उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# सौंदाळा ग्रामसभेने घेतला आदर्शवत ठराव शिव्या दिल्या तर होतोय ५०० रुपयांचा दंड

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नेवासा तालुक्यातील सौंदाळा गाव राज्यभरात आदर्श ठरत आहे. या गावातील ग्रामसभेने घेतलेले ठराव अनुकरणीय ठरत आहेत. सौंदाळा गावात झालेल्या ग्रामसभेत गावातील महिला आणि पुरुषांनी तसंच बाहेरुन आलेल्या लोकांनी यापुढं शिव्या द्यायच्या नाहीत. जर शिव्या दिल्या तर ५०० रुपयांचा दंड सक्तीनं आकारण्यात येईल, असा ठराव करण्यात आलाय. तसंच यासंदर्भातील बॅनर ग्रामपंचायतीच्या वतीनं गावात अनेक ठिकाणी लावण्यात आले आहेत. येथील काही जणांना कारवाईलाही सामोरे जावे लागले आहे.



सौंदाळा ग्रामसभेत अनेक आदर्शवत ठराव मंजूर करण्यात आले आहेत. आई-बहिणीवरुन शिवी देणाऱ्यांकडून ५०० रुपयांचा सक्तीचा दंड आकारण्याचा निर्णय गावानं घेतलाय. तसंच सेलफोनच्या अतिरिक्त वापरामुळं शालेय विद्यार्थी अभ्यास करत नसल्याचं निदर्शनास आल्यानं यापुढं संध्याकाळी ७ ते रात्री ९ यावेळेत घरातील शालेय विद्यार्थ्यांकडं मोबाईल द्यायचा नाही. मोबाईल दिसला तर त्या कुटुंबीयांना ५०० रुपये दंड भरावा लागेल. तसंच बालकामगार मुक्त गाव करण्यासाठी बालकामगार दाखवा एक हजार रुपये मिळवा, असं घोषवाक्य ठरवून बालकामगार निदर्शनास आल्यास त्याचा फोटो काढून ग्रामपंचायतीकडे आणून द्यावा, त्या व्यक्तीस एक हजार रुपये बक्षीस दिलं जाईल, असाही ठराव ग्रामसभेत संमत करण्यात आलाय. समाजहिताचे निर्णय घेण्याच्या बाबतीत सौंदाळा गाव आघाडीवर राहिलं आहे. यावेळी ग्रामसभेत आई आणि बहिणीच्या नावाने शिव्या देण्यास बंदी घालण्यात आली आहे. जो शिव्या देईल त्याच्यावर ग्रामपंचायतीकडून दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा ठराव ग्रामसभेत मंजूर झाल्याने स्थानिकांनी देखील या निर्णयाचं स्वागत करत काटेकोर पालन करण्यात येणार असल्याचं म्हटलंय.

सौंदाळा गावात ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेत. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांना ऑडिओही बसवण्यात आलाय. त्यामुळं कोणीही शिवी दिली तर लगेचच ग्रामपंचायतमधील कर्मचाऱ्यांना याची माहिती कळेल. इतकंच नाही तर सायंकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत गावातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांचे एक पथक गावात फिरणार आहे. या वेळेत शालेय विद्यार्थ्यांकडं सेलफोन आढळल्यास त्यांच्या पालकांकडून ५०० रुपये दंड आकारण्यात येईल. तसंच बालकामगार मुक्त गाव करण्यासाठी कोणीही बालकामगार कामाला ठेवू नये आणि ठेवल्यास त्याच्यावर देखील कठोर कारवाई करण्यात येणार आहे. त्याच बरोबर कोणालाही बालकामगार निदर्शनास आल्यास त्याचा फोटो काढून ग्रामपंचायतीकडं आणून देणाऱ्याला एक हजार रुपये बक्षीस दिलं जाणार असल्याची माहिती सरपंच शरद आरगडे यांनी दिलीय.

येथील दोन शेतकऱ्यांचा शेतीच्या बांधावरून वाद झाला. तेव्हा त्यांनी एकमेकांना शिव्या दिल्या. सकाळी सरपंच शरदराव आरगडे यांनी सदर वादाचा मुद्दा असलेल्या बांधावर जाऊन त्यांना बांधावर पोल उभे करण्याचं सांगून वाद मिटवला. यावेळी दोघांनीही एकमेकांना शिव्या दिल्याचं प्रामाणिकपणे मान्य करून ग्रामपंचायतचा ५०० रुपये दंड भरला. ग्रामपंचायतने त्यांच्या प्रामाणिकपणाचं कौतुक करून यापुढे शिव्या न देता बांधभाऊ म्हणून गोडीगुलाबीने राहण्यास सांगितलं. दंड भरून यापुढे शिवीगाळ करणार नसल्याचं सांगितलं. यावेळी ग्रामसेवक प्रतिभा पिसोटे यांनी दंड रक्कम ग्रामनिधित भरणार असून सदरच्या रकमेतून शिवीगाळ न करण्यासाठी प्रबोधन व्हावे म्हणून फ्लेक्स बोर्ड लावणार असल्याचं सांगितलं

## शेतरस्ते खुले करण्यासाठी नाशिक जिल्हाधिकाऱ्यांचे विशेष परिपत्रक

**कोपरगाव । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील शेतरस्ते अडथळामुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी तातडीने विशेष परिपत्रक काढले आहे. शेत तिथे रस्ता आंदोलनाची दखल घेत त्यांनी प्रशासनाला शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन अतिक्रमण हटवण्यासाठी मोहिम राबवण्याचे आदेश दिले आहेत.

शासनाने दिलेल्या निर्देशांनुसार गाव नकाशांमध्ये दाखवलेले पायमार्ग ८.२५ फूट रुंदीचे, तर मुख्य रस्ते १६.५ ते २१ फूट रुंदीचे असतील. प्रलंबित प्रकरणे सोडवण्यासाठी तहसीलदारांना ठिकाणी जाऊन पाहणी व मोजणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांनी तालुका प्रशासन, ग्रामपंचायती, भूमी अभिलेख विभाग, तसेच पोलीस विभागाला या मोहिमेसाठी आवश्यक साधने आणि पोलीस बंदोबस्त निशुल्क उपलब्ध करून देण्याच्या



सूचनाही दिल्या आहेत.

शिवपानंद शेतरस्ता चळवळीच्या प्रयत्नांमुळे जिल्हाधिकाऱ्यांनी दोन दिवसांत हे परिपत्रक काढले, यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न सुटण्यास मदत होईल, असे शरद पवळे आणि दादासाहेब जंगले पाटील यांनी सांगितले.

## आत्मा मालिक हॉस्पिटलतर्फे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन



**कोपरगाव । प्रतिनिधी**

कोकमठाण येथील विश्वात्मक जंगली महाराज आश्रम संचलित आत्मा मालिक हॉस्पिटलतर्फे मोफत आरोग्य तपासणी व वैद्यकीय सेवांचे आयोजन करण्यात आले आहे. १ डिसेंबरपासून सुरू झालेल्या या शिबिराचा कालावधी २१ जून २०२५ पर्यंत असणार आहे. शिबिरात बीपी, शुगर, सामान्य आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, दंत तपासणी व प्राथमिक उपचार यांसह अँजिओग्राफी व इतर चाचण्यांसाठी मोफत सेवा दिली जातील. याशिवाय, औषधांवर २०%, एक्स-रे, सोनोग्राफी, सिटीस्कॅनवर ५०% सवलत तसेच अँजिओप्लास्टी व बायपास सर्जरी सवलतीच्या दरात उपलब्ध असणार आहेत. या शिबिराचे उद्दिष्ट ३५,००० रुग्णांपर्यंत पोहोचण्याचे आहे. गरजू रुग्णांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी यांनी केले आहे

## राष्ट्रसंत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी




**गंगाखेड । प्रतिनिधी**

गंगाखेड शहरातील भगवती मंदिराजवळील शिवाजी चौकात राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आली.

राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी स्वच्छता, प्रबोधन, देशभक्ती, आणि बंधुभाव या विचारांचा प्रचार केला. त्यांनी आपल्या साध्या भाषेतून समाजाला स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. त्यांच्या विचारांवर आधारित कार्य करण्याची आजच्या युगातही गरज असल्याचे यावेळी वक्त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने स्वच्छता दूत शिवराज मुंडे, सामाजिक कार्यकर्ते विक्रम बाबा इमडे, परीट समाजाचे तालुका अध्यक्ष सुनीलराव वाघमारे, आणि ईस्तेयाक अन्सारी यांचा पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी महापुरुष जयंती समितीचे संकल्पक माधवराव चव्हाण, मार्गदर्शक नारायणराव घनवटे, डॉ. सचिन सुपेकर, नारायण आडे (पोलीस पाटील, बोथी), अंबादास चव्हाण, दिगंबर यादव, सखाराम इरकर, सर्जेराव घनवटे, नेमीचंद नखत यांच्यासह शहरातील व्यापारी वर्ग व समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रसंतांच्या विचारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि स्वच्छता व सद्भावनेचा संदेश देण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## इसारवाडी फाटा येथे शेतकरी कृती समितीचा रस्ता रोको आंदोलन



**गंगापूर । प्रतिनिधी**

इसारवाडी फाटा येथे शेतकरी कृती समितीच्या वतीने विविध मागण्यांसाठी (२० डिसेंबर) रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यामध्ये परिसरातील शेकडो शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. सरकारच्या दुर्लक्षामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आपल्या मागण्या पूर्ण होईपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

शेतकऱ्यांनी आंदोलनादरम्यान पुढील मागण्या मांडल्या ज्यात खरीप २०२४ पिकविमा मंजूर करावा,अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी,कर्जमाफी योजना राबवावी आणि कर्जवसुली स्थगित करावी,ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव जाहीर करून तातडीने तोड व्यवस्था करावी या मागण्यांचा समावेश आहे.

सहाय्यक निबंधक के.एम. चौधरी आणि मंडळ अधिकारी अभय साब्दे यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून शेतकऱ्यांचे निवेदन स्वीकारले. या मागण्या उच्चस्तरावर मांडण्यात येतील, असे त्यांनी आश्वासन दिले.

या आंदोलनाचे नेतृत्व राहुल ढोले, महेशभाई गुजर, अण्णासाहेब जाधव, योगेश शेळके, विठ्ठल कुंजर, बद्रीनाथ ढोले, धनंजय ढोले, किरण वालतुरे, भरत काळुंखे, प्रशांत इंगळे, संतोष खवले, मुस्ताक पटेल, वसंत गावंडे, लक्ष्मण ढोले, अरुण निकम, गणेश बोराडे आणि संदीप तोगे यांनी केले.

शेतकऱ्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, मागण्या तातडीने मान्य न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारले जाईल. शासनाने शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी ठोस पावले उचलावी, अशी मागणी करण्यात आली.

रस्ता रोको आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. मात्र, आंदोलन शांततापूर्णपणे पार पडले. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे, अन्यथा लढा तीव्र होईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला

### कांद्यावरील निर्यात शुल्क हटवा;भाव गडगडल्याने शेतकरी हवालदिल

## खा.नीलेश लंके यांची पियुष गोयल जितिन प्रसाद यांच्याकडे मागणी

**पारनेर । प्रतिनिधी**

देशांतर्गत बाजारपेठेत कांद्याचे भाव कोसळल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर लावलेले २० टक्के निर्यात शुल्क तात्काळ हटविण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी शुक्रवारी वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल, राज्यमंत्री जितिन प्रसाद यांची भेट घेउन केली.

खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली मंत्री पियुष गोयल यांना भेटलेल्या शिष्टमंडळात खासदार नीलेश लंके, बजरंग सोनवणे, खा. शोभा बच्छाव, खा. राजाभाउ वाझे, खा. गोवाल पाडवी, खा. वर्षा गायकवाड, खा. भास्कर भगरे, खा. मारूतीराव कोवासे यांचा समावेश होता. खा. लंके यांनी गोयल यांच्याशी संवाद साधत महाराष्ट्रातील कांदा उत्पादन तसेच भाव कोसळल्याने शेतकऱ्यांवर ओढावलेल्या संकटाबाबत चर्चा केली.

खासदार लंके यांनी गोयल यांना निवेदन सादर केले असून त्यात नमुद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादनात अग्रेसर आहे. महाराष्ट्रातील कांद्याला विदेशात मागणी असल्याने परदेशात मोठया प्रमाणावर महाराष्ट्रातील कांद्याची निर्यात केली जाते. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारीत भाव मिळत नाही. अगोदरच कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या कांद्याला उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळत आहे. असे असताना भारत सरकारने कांद्याच्या निर्यातीवर २०



टक्के निर्यात शुल्क लावले आहे. त्यामुळे कांदा उत्पादकांना मोठे नुकसान सोसावे लागत आहे. या शुल्कामुळे कांद्याच्या निर्यातीवरही परिणाम होत असल्याचे खा. लंके यांनी या निवेदनात नमुद केले आहे. महाराष्ट्रामध्ये उन्हाळी कांद्याचा साठा संपला असून राज्यातील विविध बाजार समित्यांमध्ये गुलाबी कांद्याची आवक होत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये बाजार समित्यांमध्ये कांद्याची मोठया प्रमाणावर आवक झाल्याने शेतकऱ्यांना दुहेरी मनस्ताप सहन करावा लागतो आहे. आगोदरच अवकाळी पाउस, बदलते हवामान यामुळे कांदा उत्पादनात आणि उत्पन्नातही घट आली आहे. तर दुसरीकडे त्यांना त्यांचा कांदा कमी दरात विकावा लागत असल्याचे खा. लंके यांनी मंत्री पियुष गोयल यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

### राज्यमंत्री प्रसाद यांनाही निवेदन

**केंद्रीय वाणिज्य राज्यमंत्री जितिन प्रसाद यांचीही खा.लंके यांनी भेट घेऊन कांद्याचे भाव कोसळल्याने महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडल्याचे निदर्शनास आणून दिले.वाणिज्य मंत्रालयाने कांदा निर्यातीवरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्याची मागणी लंके यांनी केली.जितिन प्रसाद यांनाही खा.लंके यांनी निवेदन सादर केले.**

### शेतकऱ्यांना दिलासा द्या

**कांदा उत्पादकांचे हित लक्षात घेउन केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर लावलेले २० टक्के निर्यात शुल्क हटवावे. जेणेकरून शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकेल आणि त्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई होऊ शकेल.**

**खा. नीलेश लंके**
**लोकसभा सदस्य**

# २१ आदर्श शिक्षकांचा भाऊसाहेब माने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव

**उमरखेड । प्रतिनिधी**

पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात २१ आदर्श शिक्षकांना 'भाऊसाहेब माने आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आले. या पुरस्कार वितरणाचा समारंभ पंचायत समिती सभागृहात गटविकास अधिकारी किरण कोळपे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. उमरखेड तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रात उत्तुंग कार्य करणारे दिवंगत आमदार आणि पंचायत समितीचे पहिले सभापती, लोकनेते भाऊसाहेब माने यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्याच नावाने हा पुरस्कार सुरू करण्यात आलेला आहे. २०२० मध्ये माजी सभापती प्रजानंद खडसे यांनी हा पुरस्कार सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. या पुरस्काराचे मुख्य उद्दिष्ट आदर्श शिक्षकांना सन्मानित



करणे आणि शिक्षकांनी भाऊसाहेब माने यांचा आदर्श घेऊन आपल्या कार्यात सुधारणा घडवून आणावी, हे आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी सतिश दर्शनवाड आणि भाऊसाहेब माने जिनिंग अँड प्रेसिंग सहकारी संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव माने उपस्थित होते. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची यशस्वी पार पडली. गटविकास अधिकारी किरण कोळपे यांनी आपल्या भाषणात भाऊसाहेब माने यांचे कार्य आणि शिक्षकांनी त्यांचा आदर्श घेऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण द्यावे, असे सांगितले.

सतिश दर्शनवाड यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला की, १७७ शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षिकांनी केलेल्या कार्याचे मुल्यांकन करण्यात आले. शिक्षण विभागाच्या निवड समितीने प्रत्येक शाळेचा दौरा करून गुणवत्तेवर आधारित शिक्षकांची निवड केली.

कार्यक्रमात २१ शिक्षकांचा सत्कार करण्यात आला, ज्यामध्ये शालीग्राम उबाळे, सचिन डुब्बेवार, भुंजगा इनकर, अशोक वंजारे, प्रकाश मोहकर, सतिश बन्सोडे, नितिन उघडे, नथ्थु पुंडे, वैशाली कुलथे, मनोज कटकमवार, गोविंद फड, गुलाबराव देशमुख, विशाल रनमले, कैलास चव्हाण, देवका चव्हाण, अमरीन बेगम, संतोष घुगे, अरुण बुरकुले, अविनाश नरवाडे, बालाजी कदम आणि गजानन जाधव यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवीण सूर्यवंशी यांनी केले. संचालन गजानन देवकते यांनी केले, तर आभार सुरेश वाघ यांनी मानले.

या पुरस्कारामुळे शिक्षकांना एक नवीन प्रेरणा मिळेल आणि त्यांच्या कार्याची सामाजिक व शैक्षणिक मूल्यांची ओळख होईल. शिक्षकांनी गुणवत्ता आणि नवोन्मेषी शिक्षण पद्धतींवर काम करणे आवश्यक आहे, हे या कार्यक्रमातून स्पष्ट झाले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन पंचायती समितीच्या शिक्षण विभागाने केले असून त्याच्या माध्यमातून शिक्षकांना अधिक प्रोत्साहन मिळणार आहे

# कल्याणमधील सोसायटीमध्ये राडा परप्रांतीयांकडून मराठी कुटुंबावर हल्ला

**कल्याण | प्रतिनिधी**

महाराष्ट्रमध्ये राहून परप्रांतीयकडून मराठी माणसाची गळचेपी होताना दिसतं आहे कल्याणच्या योगीधाम परिसरात असणाऱ्या अजमेरा हाईटस् या उच्चभ्रू रहिवाशांच्या सोसायटीत हा प्रकार घडला. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळमध्ये अकाऊंटंट मॅनेजर असलेले अखिलेश शुक्ला आणि वर्षा कळवीकट्टे हे अजमेरा सोसायटीत आजूबाजूला राहतात. नेहमीप्रमाणे अखिलेश शुक्ला यांच्या पत्नी गीता या घराबाहेर देवपूजा करुन धूप लावतात. या धूपाचा प्रचंड धूर होतो. हा धूर वर्षा कळवीकट्टे यांच्या घरात जायचा. या धुराचा घरात असलेल्या तीन वर्षाच्या बाळाला त्रास व्हायचा. तसेच घरात असलेली वयोवृद्ध आईलाही दम लागायचा. त्यामुळे कळवीकट्टे कुटुंबीयांनी शुक्ला यांना बाहेर धूप न लावण्याविषयी विनंती केली होती. यावरुन अखिलेश शुक्ला यांची पत्नी गीता शुक्ला यांनी उद्दामपणे कळवीकट्टे कुटुंबीयांशी वाद घालायला सुरुवात केली.

हा वाद सुरू असताना बाजूला राहणारे अभिजीत देशमुख आणि त्यांचे भाऊ धीरज देशमुख यांनी वाद सोडवण्यासाठी मध्यस्थी करत वाद सोडवण्याचा प्रयत्न केला. देशमुख यांनी वाद सोडण्याचा प्रयत्न केला. याचा राग शुक्ला याला आला आणि शुक्लाने १० ते १५ गुंडांना बोलावून देशमुख बंधूंना लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली. या घटनेत अभिजित देशमुख गंभीर जखमी झाले असून त्यांना मुंबईच्या सायन रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले आहे. शुक्ला हे या सोसायटीत वादग्रस्त असल्याचे समोर आले आहे. अनेक मराठी माणसांना शुक्ला याने त्रास दिला आल्याचा आरोप सोसायटीतील नागरिकांनी केला आहे. तुम्ही मासे खाणारे मराठी माणसं घाण, भिकारी आहात. तुमचे मराठीपण बाहेर काढतो असं म्हणत गुंडांकरवी मराठी भाषिकांना मारहाण केलेल्या अखिलेश शुक्ला या व्यक्तीबद्दल नवीन माहिती समोर आली आहे. एमटीडीसीमध्ये अकाऊंट मॅनेजरपदावर कार्यरत असणारा हा व्यक्ती खासगी गाडीवर अंबर दिवा लावून फिरायचा. त्याच्या गाडीवर महाराष्ट्र शासन असं लिहिल्याचंही समोर आलं आहे. तसेच सोसायटीतील नागरिकांना तो आय.ए.स अधिकारी असल्याचं सांगायचा आणि अरेरावी करायचा अशी माहिती समोर आली आहे. मराठी भाषिकांना मारहाण प्रकरणाची तक्रार दाखल करून पोलिस आता या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत

या प्रकरणाचा मनसेने सुद्धा समाचार घेतला आहे मनसेने या घटनेचा निषेध केला असून मनसे जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर यांनी खडकपाडा पोलिसांची भेट घेतली आहे दोन दिवसात अखिलेश याला अटक झाली नाही तर रस्त्यावर उतरू व मनसे स्टाईलने त्याचा शोध घेऊन त्याला पोलिसांसमोर हजर करू असा इशारा दिला आहे तसेच सोसायटीतील रहिवाशांनी सुद्धा गुरुवारी रात्री सोसायटी गेट समोर निषेध आंदोलन केले असून मारहाण करणारा मंत्रालयीन अधिकारी अखिलेश शुक्ला याला अटक झाली नाही तर शुक्रवारी डीसीपी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल असा इशारा यावेळी आंदोलनकर्त्यांनी दिला आहे





# महाराष्ट्र योग शिक्षक संघाची कार्यकारिणी गठित

**तळोधी (बा) | प्रतिनीधी**

योग फाऊंडेशन महाराष्ट्र संचालित महाराष्ट्र योग शिक्षक संघाची कार्यकारिणी नागभिड-ब्रम्हपुरी तालुक्यात गठित करण्यात आली. शंकर पार्वती भवन, ब्रम्हपुरी येथे झालेल्या बैठकीत सर्वानुमते लोकेश मुळे (अड्याळ टेकडी) यांची अध्यक्षपदी तर निरंजन रामराव बोरकर (गिरगाव) यांची सचिवपदी निवड करण्यात आली.

तर उपाध्यक्षपदी शालिनी गव्हाणे, जितेंद्र कुथे, सहसचिवपदी संदिप कामडी, कोषाध्यक्षपदी कोमल आठवले, संघटनासचिवपदी जिजा येरणे, सहसंघटनासचिवपदी नंदा गिरपुंजे, कार्यालयीन सचिवपदी मनोज मेश्राम, मिडिया प्रभारी म्हणून वैभव कापगते, आणि सोशल मिडिया प्रभारी म्हणून प्रतिक झोडे यांची नेमणूक करण्यात आली.

विशेष निमंत्रित सदस्य म्हणून सोनाली वैद्य, श्रुती बनपुरकर, वर्षा गायकवाड, शुभम नखाते, आणि ईश्वर गहाणे यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. या बैठकीला ब्रम्हपुरी-नागभिड तालुक्यातील योग शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते



# नवनियुक्त मंत्री ना.मेघना बोर्डीकर-साकोरे यांचा सत्कार




**गंगाखेड | प्रतिनीधी**

नवनियुक्त मंत्री ना. मेघना बोर्डीकर / साकोरे यांचा गंगाखेड येथील कट्टर समर्थक शिवराज दिडशेरे पाटील आणि व्यवसायिक संतोष टोले यांनी नागपूर येथे सदिच्छा भेट घेत त्यांना शुभेच्छा दिल्या.

या भेटी दरम्यान, संतोष टोले यांनी आगामी काळात गंगाखेड तालुक्यात आणि जिल्ह्यात विविध विकासकामे आपल्या नेतृत्वाखाली होत राहावी, अशी आशा व्यक्त केली. तसेच, त्यांनी गंगाखेडला नागरी सत्करासाठी येण्याचे आमंत्रण दिले.

हे स्वागत आणि शुभेच्छा गंगाखेडच्या विकासासाठी एक सकारात्मक आणि प्रेरणादायक पाऊल ठरणार आहे.

# प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेतर्गत वारसास दोन लाख रुपयाचा धनादेश



**तळोधी(बा) | प्रतिनीधी**

प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना ही जीवन विमा संरक्षण प्रदान करणारी एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेतर्गत नागभीड तालुक्यातील किटाळी येथील दिवाकर झोडे यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया किटाळी येथील ग्राहक सेवा केंद्रामध्ये जनधन खाते उघडून दोन महिन्यांपूर्वी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा घेतला होता.

दुर्दैवाने दिवाकर झोडे यांचा अचानक मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या पत्नी विजया दिवाकर झोडे यांना २ लाख रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला.

या प्रसंगी बँक ऑफ इंडिया नागभीडचे शाखाधिकारी विनोद धवराल, सर्व्हिस मॅनेजर विकास मेश्राम, कॅशिअर शिल्पा गायकवाड, कर्मचारी स्नेहाली पाटील, संतोष पवार, ग्राहक सेवा केंद्र चालक संदीप मसराम आणि गंगाधर पाकमोडे उपस्थित होते.

# शिरूर तालुक्यात विधानसभा निवडणुकीनंतर अवैध धंद्यांचा सुळसुळाट

**शिरूर | रमेश बनसोडे**

राज्यात विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीचे सरकार सत्तेत आले असले, तरी शिरूर तालुक्यातील परिस्थिती चिंताजनक आहे. निवडणुकीनंतर अवैध धंद्यांना उधाण आले असून, शिक्रापूर, रांजणगाव गणपती, एमआयडीसी आणि शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत गुटखा विक्री, खर्रा, गावठी दारू, जुगार आणि मटक्याचे व्यवसाय जोरात सुरू आहेत.

पुणे जिल्ह्यात वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्यानंतर ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांच्या नेतृत्वाखाली अवैध धंद्यांवर मोठ्या प्रमाणात आळा घालण्यात आला होता. मात्र, विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा या धंद्यांना नव्याने उधाण आले आहे. परिणामी, शिरूर तालुक्यात पोलीस प्रशासनाचा धाक आहे का, असा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण झाला आहे.

शिरूर तालुक्यात गल्ली-बोळांमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असून, काही पोलीस आणि राजकीय नेत्यांचे नातेवाईक वाहनांवर आमदार, खासदार अशा पाट्या लावून बिनधास्त फिरताना दिसतात. यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे.

तालुक्यात अनेक वाहनांवर काळ्या काचा, फॅन्सी नंबर प्लेट, चमकणाऱ्या लाइट्स आणि कर्कश हॉर्न लावून नियमांचे उल्लंघन केले जात आहे. सामान्य माणसांवर लगेच दंडात्मक कारवाई केली जाते, पण राजकीय नेत्यांच्या नातेवाईकांवर मात्र पोलीस कारवाईस धजावत नाहीत, असे चित्र दिसत आहे.

या परिस्थितीत सर्वसामान्य जनता पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित करत आहे. गुन्हेगारांवर कठोर कारवाई न झाल्यास गुन्हेगारी आणखी बळावण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पोलीस प्रशासनाने तत्काळ कठोर पावले उचलून सामान्य नागरिकांच्या मनातील भीती दूर करावी, अशी मागणी होत आहे.

# जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलच्या वतीने उत्साहापूर्ण वातावरनामध्ये स्टुडंट्स लीड कॉन्फरेन्सचे आयोजन

**सोलापूर | प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलच्या वतीने अत्यंत आनंदमय व उत्साही वातावरणात लीड स्टुडंट्स कॉन्फरेन्स चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आधुनिक युगातील विविध प्रकारची मॉडेल्स, आदित्य सूर्ययान, रोबोट, महिला अंतराळवीर सुनिता विल्यम आणि आकर्षक कलाकृती सादर केली.

या कार्यक्रमासाठी ज्योती मुथा व डॉ. स्वाती घाडगे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहिल्या. मुथा व घाडगे यांनी आपल्या भाषणाद्वारे विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले व सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयप्रकाश बिले , संचालिका स्वाती बिले, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक स्टाफ व शिक्षेकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात पालक वर्ग उपस्थित होता. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेच्या संचालिका, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक स्टाफ व शिक्षेकेतर कर्मचारी यांनी खूप परिश्रम घेतले. तसेच विविध उपकरणे बनविण्यासाठी पालकांनीही खूप परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनश्री साने यांनी केले.



# श्री सिद्धेश्वर महायात्रेचे सूक्ष्म नियोजन करावे उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुने

**माळशिरस | प्रतिनिधी**

श्री सिद्धेश्वर महायात्रा दिनांक १२ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत आहे. या यात्रेदरम्यान ग्रामदैवत श्री सिद्धेश्वराच्या दर्शनासाठी हजारो भाविक येतात तसेच होम मैदानावरील मनोरंजन नगरी येथे मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित राहतात. त्यामुळे सर्व संबंधित विभागानी यात्रा यशस्वी करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करून ठेवावे असे आवाहन उपविभागीय अधिकारी सदाशिव पडदुने यांनी केले.

नियोजन भवनाच्या सभागृहात आयोजित श्री सिद्धेश्वर महायात्रा २०२५ अंतर्गत पूर्वतयारी आढावा बैठकीत उपविभागीय अधिकारी पडदुने बोलत होते. यावेळी अन्न सुरक्षा अधिकारी रेणूका पाटील, अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क भाग्यश्री जाधव, पोलिस उपनिरिक्षक प्रकाश किणगी, विद्युत विभागाचे शाखा अभियंता यू.एस.पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहायक अभियंता विशाल लेंगरे, महावितरण सोलापूर शहरचे कार्यकारी अभियंता आशिष मेहता, सोलापूर महानगरपालिकेचे पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, यांच्यासह पोलीस व संबंधित विभागाचे अधिकारी तसेच देवस्थान पंच कमिटीचे सदस्य उपस्थित होते.




यावेळी उपविभागीय अधिकारी पडदुने पुढे म्हणाले, यात्रा कालावधीत मंदिर, मंदिर परिसर व होम मैदान या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था अत्यंत चोख असावी. पोलीस विभागाने यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांची गर्दी विचारात घेता योग्य नियोजन करावे. देवस्थान समितीनेही त्यांच्याकडील स्वयंसेवक व कर्मचारी गर्दीवर नियंत्रणासाठी पोलीस विभागाला सहकार्य करतील याची दक्षता घ्यावी असेही त्यांनी सांगितले.

श्री सिद्धेश्वर महायात्रा कालावधी जवळपास एक महिन्याचा असल्याने या कालावधीत सर्वसामान्य नागरिक भक्तगण यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही तसेच वाहतूक व्यवस्था सुरळीत रहावी यासाठी वाहतूक विभागाने वाहन व्यवस्था पार्किंगची व्यवस्था, महानगरपालिका, मंदिर समितीने व अन्न सुरक्षा विभागाने अन्न पदार्थ तपासून घेणे व त्यांच्याकडील होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट वेळेत व योग्य ठिकाणी लावावी, त्यामुळे भाविकांच्या व सर्वसामान्यांचे आरोग्याच्या दृष्टिने हिताचे असेल, तसेच जास्तीत जास्त सीसीटीव्ही कॅमेरे लावून पोलिस विभागाने नागरिकांची सुरक्षेला प्राधान्य देऊन अवैध धंद्यांवर बारकाईने लक्ष ठेवावे.

अक्षता कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित राहतात त्या अनुषंगाने काटेकोर नियोजन करावे. सर्व संबंधित शासकीय यंत्रणा तसेच श्री सिद्धेश्वर मंदिर देवस्थान पंच कमिटीचे सदस्य यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून ही महायात्रा शांततेत पार पाडावी.

श्री सिद्धेश्वर महायात्रा दिनांक १२ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत होत असून दिनांक १२ जानेवारी रोजी ६८ लिंग प्रदर्शन १३ जानेवारी रोजी अक्षता कार्यक्रम १४ जानेवारी होम हवन असे कार्यक्रम होणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

# मुख्याध्यापक पदासाठी बोगस प्रस्ताव दाखल;संस्थाध्यक्षांची तक्रार

**सोलापूर | प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील श्री आदिनाथ महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संगोबा या संस्थेतील मुख्याध्यापक पदासाठी बोगस प्रस्ताव दाखल केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. संस्थेचे अध्यक्ष ज्ञानदेवराव गणपत गायकवाड यांनी या प्रकरणाची तक्रार शिक्षणाधिकाऱ्यांकडे लेखी स्वरूपात दाखल केली आहे.

सुनील शिंदे यांनी अध्यक्ष गायकवाड यांच्या सह्या, संस्थेचे लेटरहेड आणि शिक्के बनवून स्वतःचा प्रस्ताव शिक्षणाधिकारी कार्यालयात सादर केला. प्रा. राजेश गायकवाड यांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार संस्थेच्या निदर्शनास आला. त्यानंतर अध्यक्ष गायकवाड यांनी बोगस सह्या, लेटरहेड आणि शिक्क्यांच्या आधारे शिक्षणाधिकाऱ्यांकडे कारवाईची मागणी केली. श्री संगमेश्वर विद्यालय संगोबा ही संस्था गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी १९६७ साली स्थापन करण्यात आली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानदेवराव गायकवाड यांनी आयुष्यभर या संस्थेसाठी काम केले. मात्र, सुनील शिंदे यांनी संस्थेतील अधिकारांवर कब्जा मिळवण्यासाठी वारंवार प्रयत्न केले. १९९६ पासून शिंदे यांनी संस्थेत दुफळी निर्माण करून मुख्याध्यापक पदावर स्वतःची नियुक्ती करण्यासाठी बनावट गुन्ह्यांच्या माध्यमातून वरिष्ठ शिक्षकांना त्रास दिला. तसेच, शिक्षणाधिकारी जगताप यांच्यासोबतचे फोटोज स्टेटसवर टाकून आर्थिक लाभ घेतल्याचे आरोपही त्यांच्यावर आहेत. संस्थेचे अध्यक्ष गायकवाड यांनी या प्रकरणात शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्याकडे तक्रार दाखल केली असून, २३ डिसेंबर २०२४ रोजी सुनावणी होणार आहे. जगताप हे कायद्याचे पालन करणारे अधिकारी असल्याने त्यांच्या निर्णयाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष आहे. संस्थेचे अध्यक्ष गायकवाड यांनी मुख्याध्यापक पदासाठी झालेल्या बोगस प्रस्तावाची शहानिशा करून तो प्रस्ताव नामंजूर करावा, तसेच सुनील शिंदे यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.



**संस्थेतील कोणत्याही पदासाठी बैठक झाली नाही किंवा ठराव मंजूर करण्यात आलेला नाही. बोगस कागदपत्रांवर कारवाइ झाली नाही, तर २६ जानेवारी रोजी झेड पी समोर आमरण उपोषण करणार.**

**डी. जी. गायकवाड,**
**अध्यक्ष, श्री आदिनाथ महाराज**
**शिक्षण प्रसारक मंडळ.**

# मोहोळ तालुका खो-खो क्रिडा स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खंडोबाचीवाडीचा दबदबा कायम

## खंडोबाचीवाडीच्या खो-खो संघांची अजिंक्य ठरली कामगिरी

**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ तालुक्यातील खो-खो स्पर्धांमध्ये खंडोबाचीवाडीच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संघांनी आपला दबदबा कायम ठेवला आहे. नुकत्याच पार पडलेल्या मोहोळ तालुका हिवाळी क्रीडा स्पर्धेत खंडोबाचीवाडी शाळेच्या लहान व मोठ्या गटाच्या संघांनी प्रथम क्रमांक मिळवून विजयाची परंपरा आणखी वृद्धिंगत केली.

या स्पर्धा मोहोळ स्टेशनच्या श्री दत्त प्रशालेत पार पडल्या. खंडोबाचीवाडी शाळेने मागील १५ वर्षांपासून खो-खो खेळात अजिंक्यपद राखले आहे. यावर्षीदेखील लहान व मोठ्या गटांच्या मुलांनी तामडाग व कोथाळे शाळांना पराभूत करत विजेतेपद मिळवले.

खो-खो संघाच्या यशस्वी मार्गदर्शनासाठी किशोर गुंड, महेश राऊत, महादेव गुंड, विजय गुंड, सुरज गुंड, अमोल इंगळे, सुमित शिंदे, जयराम गुंड यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. विजेत्या संघांच्या खेळाडूंना गटशिक्षणाधिकारी अविचल महाडिक, शिक्षणविस्तार अधिकारी मल्लिनाथ स्वामी आणि बंडू शिंदे यांच्या हस्ते ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच, विजेते खेळाडू आणि प्रशिक्षकांचा खंडोबाचीवाडी ग्रामस्थांनी सत्कार केला. विजयी संघाच्या खंडोबाचीवाडीत आगमनानंतर ग्रामस्थांनी तोफांच्या सलामीने स्वागत केले आणि खेळाडूंना व प्रशिक्षकांना फेटे बांधून सत्कार केला.



### सलामीवीर धावले सलग पाच मिनिटे

संघाच्या एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे सलामीला आलेले तीन सलामवीर खेळाडू नाबाद सलग पाच मिनिटे धावले. त्यांना एकल मंचाचे जिल्हा सरचिटणीस व माजी शिक्षक विजय वाघमारे यांनी पाचशे रुपयांचे बक्षिस दिले.

# सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाला ९ कोटी १० लाखांचा निधी मंजूर

## भिगवणकरांची प्रदूषणाच्या समस्येतून सुटका

**सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रकल्प मंजूर झाला आहे. या प्रकल्पामुळे नदीचे प्रदूषण रोखले जाऊन दूषित पाण्याची समस्या सुटेल. प्रकल्पा बाबतची सविस्तर माहिती ग्रामसभेत मांडली जाईल आणि संबंधित कागदपत्रे ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करून दिली जातील,असे सरपंच क्षीरसागर यांनी सांगितले.**




**भिगवण । प्रतिनिधी**

भिगवण शहराला सांडपाणी व्यवस्थापनाच्या समस्येचा सामना करावा लागत होता. आता या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून ९ कोटी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. स्मशानभूमीच्या परिसरात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारण्यात येणार आहे, ज्यामुळे नदी प्रदूषणासह दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आरोग्य समस्यांवर नियंत्रण मिळणार आहे.

पुण्यासारख्या शहरांमध्ये सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प राबवले जात असले तरी ग्रामीण भागांमध्ये सांडपाणी थेट नद्यांमध्ये सोडले जात असल्याने प्रदूषण वाढत आहे. या समस्येच्या तीव्रतेमुळे शासनाने पुढाकार घेत प्रकल्पांना प्राधान्य दिले आहे.या निधीमुळे भिगवण शहराच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून सांडपाणी व्यवस्थापनाच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा लागेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# २१ डिसेंबर-भंडारा बंद आणि निषेध मोर्चा

## संविधानाच्या सन्मानासाठी तीव्र विरोध

**भंडारा प्रतिनिधी**

परभणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासमोरील संविधान शिल्पाची तोडफोड झाल्यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेच्या निषेधार्थ आणि त्यानंतर पोलिसांनी आंबेडकरी समाजावर केलेल्या अमानुष अत्याचारांविरोधात भंडाऱ्यात शनिवार, २१ डिसेंबर रोजी भव्य निषेध मोर्चा व बंद पुकारण्यात आला आहे.

परभणी येथे काही समाजकंटकांनी संविधान शिल्पाची तोडफोड केली, ज्यामुळे आंबेडकरी समाजाच्या भावना तीव्र दुखावल्या. यानंतर समाजाने स्वाभाविक प्रतिक्रिया व्यक्त करत आंदोलन केले. मात्र, प्रशासनाने दडपशाहीच्या मार्गाचा अवलंब करून कोम्बिंग ऑपरेशनच्या नावाखाली महिला, पुरुष, आणि तरुणांवर अमानुष अत्याचार केले. अनेकांना बेकायदेशीर अटक करण्यात आली. विशेषतः लॉचे शिक्षण घेणाऱ्या सोमनाथ सूर्यवंशी यांना पोलिसांनी थर्ड डिग्री टॉर्चर करून ठार मारल्याचे शवविच्छेदन अहवालात स्पष्ट झाले आहे.

**नागरिक व व्यापाऱ्यांना आवाहन**

**भंडारा शहरातील व्यापारी, शाळा-महाविद्यालये, आणि नागरिकांनी संविधान संरक्षणासाठी व आंबेडकरी समाजावरील अन्यायाच्या विरोधात बंदमध्ये सहभागी होऊन पाठिंबा द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**



या दुर्दैवी घटनांच्या निषेधार्थ भंडारा येथे शनिवार, २१ डिसेंबर रोजी शहर बंद व निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हुतात्मा स्मारक, शास्त्री चौक, भंडारा येथून दुपारी २ वाजता मोर्चाला सुरुवात होणार आहे. मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक जिल्हाधिकारी चौक येथे येऊन सभेत रूपांतरित होईल. यावेळी निषेध सभा घेत प्रशासनाला आंबेडकरी समाजाच्या मागण्या निवेदनाद्वारे सादर करण्यात येतील.या मोर्चाचे आयोजन अजय मेश्राम, असित बागडे, विनय बंसोड, विनीत देशपांडे, प्रशांत सूर्यवंशी, अजित बनसोड, श्रीकांत बनसोड, रोशन जांभुळकर, राजेश मडामे, रुपचंद रामटेके, हंसराज वैद्य, ज्ञानचंद जांभुळकर, सुरज डोंगरे, शरद खोब्रागडे, सुरज भालाधारे तसेच अन्य आंबेडकरी अनुयायांनी केले आहे.

# वाफळे मोठा गट मुलींचा खो खो संघ तालुक्यात अजिंक्य



**मोहोळ । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाफळे (ता. मोहोळ) चा मोठा गट मुलींचा खो खो संघ तालुक्यात अजिंक्य ठरला आहे. या संघाची जिल्हास्तर क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. मोहोळ तालुकास्तरीय हिवाळी क्रीडा स्पर्धा मोहोळ स्टेशनच्या श्री दत्त प्रशालेत संपन्न झाल्या. सुरवातीपासूनच संघातील खेळाडूंनी आपल्या कौशल्याने उत्कृष्ठ खेळ केला.

प्रारंभात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोथाळेच्या संघास एका डावाने नमवून अंतीम सामन्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अर्जुनसोंडच्या संघाचा १ डाव १० गुणांनी पराभव केला. विजयी संघास गटशिक्षणधिकारी अविचल महाडीक, शिक्षण विस्तार अधिकारी बंडू शिंदे, मल्लिनाथ स्वामी यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

वाफळेच्या संघातील खेळाडू मिनाज रफीक शेख ही सलग पाच मिनिटे नाबाद धावली. तिला एकल शिक्षक मंचाचे जिल्हा चिटणीस विजय वाघमारे यांनी रोख पाचशे रुपयांचे बक्षिस दिले. सर्व खेळाडूंना शशीकांत कुंभार, अविनाश अंधारे, सागर जवंजाळ, शफीक शेख, बापू चव्हाण, गोरख कृपाळ यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडू आणि मार्गदर्शक यांचे मुख्याध्यापक राजाराम जाधव, शाळा व्यवस्थापनाचे अध्यक्ष अमोल गडेकर, उपाध्यक्ष चेतन जाधव, ग्रामस्थ आणि पालक यांनी अभिनंदन केले.

## सदर पोलीस अधिकारी व कर्मचारीवर कारवाईची मागणी

# रिपाईच्या शिष्टमंडळाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन;२६ डिसेंबर पासून उपोषणाचा इशारा

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे युवक तालुकाध्यक्ष जयराम आंग्रे यांना विनाकारण मारहाण करणारे एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व त्यांच्या सोबत असलेल्या तीन पोलीस कर्मचाऱ्यांवर अद्यापि कारवाई करण्यात आलेली नसल्याने २६ डिसेंबर पासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा रिपाईच्या वतीने देण्यात आला आहे. तर सदर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात तक्रार केल्याने खोट्या गुन्ह्यात अडकविण्याच्या धमक्या सदर युवकास दिल्या जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

रिपाईचे युवक तालुकाध्यक्ष जयराम आंग्रे २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी मतदान करण्यासाठी देहरे गावातील मतदान केंद्रावर गेले होते. त्या ठिकाणी मतदान करून बाहेर येत असताना एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व त्यांच्या समवेत असलेल्या तीन सहकारी पोलीसांनी त्यांना विनाकारण बेदम मारहाण केली. मारहाणीनंतर त्यांना २१ नोव्हेंबरला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.




याप्रकरणी त्यांच्यावर कारवाई होण्यासाठी आंग्रे यांनी २७ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार केलेली आहे. तक्रार केल्याचा राग येऊन सदर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून खोट्या गुन्ह्यात अडकवून जेलमध्ये टाकण्याच्या धमक्या त्यांना दिल्या जात असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आलेल्या युवकास मारहाण करणारे व तक्रार केल्याचा राग धरुन खोट्या गुन्ह्यात अडकविण्याच्या धमक्या देणाऱ्या एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व त्या तीन कर्मचारींवर कारवाई करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी रिपाईचे जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे, शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, नगर तालुकाध्यक्ष अविनाश भोसले, युवक जिल्हाध्यक्ष विवेक भिंगारदिवे, शहर उपाध्यक्ष प्रतिक नरवडे, सोनू ठोंबे, योगेश त्रिभूवन, महिला जिल्हाध्यक्षा आरती बडेकर, मायाताई जाधव आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## प्रा.डॉ विणा बबनराव नाखले यांचे निधन



**वर्धा । प्रतिनिधी**

प्रा. डॉ. विणा बबनराव नाखले (७१ वर्षे) यांचे आज शुक्रवारी विवेका हॉस्पिटलमध्ये दीर्घ आजाराने निधन झाले. धनवटे नॅशनल कॉलेजमधून त्या मराठीच्या प्राध्यापिका म्हणून सेवानिवृत्त झाल्या होत्या. त्यांच्या मागे पती डॉ. बबन नाखले, मुलगा, मुलगी आणि मोठा आप्तपरिवार आहे. उद्या सकाळी अकरा वाजता त्यांचे निवासस्थान पंचदीप नगर, वर्धा रोड, नागपूर येथून अंतयात्रा निघेल. सहकार नगर घाटावर अंत्यसंस्कार होतील.

# मैदानी खेळामुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वाढतो-प्रा.घाडगे

## विविध मैदानी स्पर्धेत खेळाडूंनी दाखवले कौशल्य

**दैनिक राज आनंद । अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नागापूर येथील रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालयाचा वार्षिक बालक्रीडा मेळावा शाळेच्या प्रांगणात उत्साहात पार पडला. झालेल्या विविध क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन आपल्या क्रीडा कौशल्याची चुणूक दाखवली.

बालक्रीडा मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य शिवाजीराव घाडगे, संस्थेचे सहसचिव नितीन घाडगे, क्रीडा विभाग प्रमुख व पर्यवेक्षक दत्तात्रय दरेकर, संतोष उरमुडे, जगदीश आव्हाड , राजेंद्र शिंदे , उल्का गवते, नंदा दुधाने, सुनंदा शिरसाठ, कोमल पाटील, भूतमपल्ले मॅडम, राजू नरोडे, कैलास उमाप, केशव गुंजाळ, राजकुमार इटेवाड, रामभाऊ पोटे, अभिजीत सांगळे, नितीन शिंदे, सोनवणे आदींसह शिक्षक वृंद, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्राचार्य शिवाजीराव घाडगे यांनी खेळाडूंना अभ्यासासोबत खेळाचे महत्त्व विशद केले. कोणताही



खेळ हा स्पर्धेपुरता न खेळता पुढे त्याचा सराव सातत्याने चालू ठेवण्याचे आवाहन केले. मुलांना खेळात करिअर करायचे असेल तर पालकांशी सुसंवाद साधणे गरजेचे आहे. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो. एकतरी आवडीचा मैदानी खेळ खेळण्याचे त्यांनी सांगितले.पर्यवेक्षक दत्तात्रय दरेकर यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करुन जीवनात खेळाचे महत्त्व पटवून दिले. खेळामध्ये जय-पराजय महत्त्वाचा नसून स्पर्धेत उतरणे व आपल्यातील कौशल्य दाखवणे महत्त्वाचे असते. शाळेच्या विद्यार्थ्यांनी उद्घाटनाप्रसंगी ढोल ताशाच्या गजरात सादरीकरण केले. यावेळी खो-खो, कबड्डी, थाळीफेक, गोळा फेक, धावणे मनोरंजनाचे खेळ, स्लो सायकलिंगचे सामने मैदानावर अतिशय चुरशीने रंगले होते. पंच म्हणून संतोष उरमुडे, कैलास उमाप तसेच कोलते, तिकटे, कवाने, रोमन यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून राजू नरोडे यांनी आभार मानले.

# आश्वासने पूर्ण होणार ;योजना बंद होणार नाहीत...महाराष्ट्र आता थांबणार नाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## लाडक्या बहिणींचा देय हप्ता अधिवेशनानंतर जमा होणार, शेतकऱ्यांना वीज बील नाही

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकरी, युवा वर्ग, ज्येष्ठ नागरिक, वंचित घटकाला दिलेली आश्वासने पूर्ण केली जातील. शासनाच्या सुरु असलेल्या योजना बंद होऊ देणार नाही, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला दिला. राज्यातील लाडक्या बहिणींना त्यांचा देय हप्ता अधिवेशन संपल्यावर देण्यात येईल, अशी ग्वाही देत महाराष्ट्र कालही नंबर एक होता, आजही नंबर एक आहे आणि उद्याही नंबर एकच राहील, महाराष्ट्राशी कोणीही स्पर्धा करू शकत नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिमानाने व आत्मविश्वासाने विधानसभेत स्पष्ट केले. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

**महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रात १ जुलै २०२२ पासून ३ लाख ४८ हजार ७० कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात आली असून यामुळे २ लाख १३ हजार २६७ इतकी रोजगार निर्मिती होणार आहे. राज्यात १० मोठ्या प्रकल्पांना आपण मंजूरी दिली असून यामध्ये २ लाख ३९ हजार ११७ कोटींची गुंतवणूक तर ७९ हजार ७२० इतकी रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. विदर्भातील ४७ मोठ्या प्रकल्पात १ लाख २३ हजार ९३१ कोटींची गुंतवणूक होऊन ६१ हजार रोजगार निर्मिती, मराठवाड्यात ३८ प्रकल्पात ७४ हजार ६४६ कोटी गुंतवणूक व ४१ हजार ३२५ रोजगार निर्मिती आणि उर्वरित महाराष्ट्रात १३६ प्रकल्पात १ लाख ४९ हजार ४९३ कोटींची गुंतवणूक होऊन १ लाख १० हजार ५८८ रोजगार निर्मिती होत आहे. यामुळे महाराष्ट्र थेट परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर आहे. छ. संभाजीनगर, जालना या ठिकाणी देखील उद्योगाचे जाळे विकसित होत आहे. राज्यात वसुलीबाजांना थारा दिला नाही तर राज्याच्या प्रगतीचा वेग दुप्पट होईल. अशा वसुलीबाजांवर आता कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा**

मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा छत्रपती शिवाजी महाराजांनी दिला. त्यानंतर केंद्रातील मोदी सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा संविधानानुसार दिला. यामुळे मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी निधी मिळणार आहे. तसेच विद्वानांना दोन पुरस्कार मिळणार आहेत. प्राचिन ग्रंथांचा अनुवाद करण्यात येणार आहे. या सर्व प्रयत्नांसह आपण आपली भाषा रूजविणार आहोत. आता न्यायालयाती निवाडे मराठीत उपलब्ध करण्यास सुरूवात होणार असल्याचेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

**महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी गेल्या अडिच वर्षात १६७ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून यामुळे २५.२१ लक्ष हेक्टर जमिन सिंचनाखील येणार आहे. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प आम्ही केला असून नदीजोड प्रकल्प, जलयुक्त शिवार योजना आणि जलसिंचन प्रकल्प यासाठी उपयुक्त आहे. वैनगंगा-नळगंगा, नारपार-गिरणा, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी, दमणगंगा-एकदरे असे नदी



जोडप्रकल्प मार्गी लावणार असल्याने विकासाला गती मिळणार आहे. राज्यातील शेतकऱ्याचे जीवनमान उंचावण्यासाठी, शेतकऱ्यांच्या पिकाला मुबलक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी नदीजोड प्रकल्प महत्वाचे आहेत. यासाठी राज्य शासनाने जल आराखडा तयार केला आहे. राज्यात बांबू लागवडीला प्रोत्साहत देण्यात असून यामुळे देखील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

**मेट्रो प्रकल्प गतीमान**

मुंबई, नागपूर, पुणे या शहरांमध्ये मेट्रोच्या कामाला अधिक गती देण्यात आली आहे. ही कामे पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांचा प्रवास अधिक गतिमान होणार आहे. मुंबईत मेट्रो टप्पा ३ चे काम अंतिम टप्प्यात असून बीकेसी ते कुलाबा ही नवीन लाईफ लाईन होणार आहे. १७ लाख प्रवाशी प्रवास करणार आहेत. मे २०२५ पर्यंत ही लाईन खुली होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**शेतकऱ्यांकडून वीज बील घेणार नाही**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात १६ हजार मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीचे प्रकल्प सुरू केले आहेत. आतापर्यंत ६६७ मेगावॅट वीज कार्यान्वित झाली. २०२६ पर्यंत १६ हजार मेगावॅट वीज कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करणार आहे. शेतकऱ्यांकडून विजेचे बिल घेणार नाही. ९ लाख कृषीपंप आज आपल्याकडे उपलब्ध आहेत. मागेल त्याला सौरपंप आम्ही देणार असून ३ महिन्यात कनेक्शन देऊ असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. २०३० साली राज्यात ५२ टक्के उर्जा अपारंपरिक स्रोतातील असेल असेही त्यांनी सांगितले.

**वाढवण बंदर विकासाचे केंद्र**

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, पालघर येथे ७६ हजार कोटी रुपये खर्च करून वाढवण बंदर करण्यात येत आहे. हे बंदर जेएनपीटीपेक्षा तीन पट मोठं असून वाढवण बंदरामुळे अनेक फायदे होणार. राज्याच्या देशाच्या विकासात वाढवण बंदरचे मोठे योगदान राहणार असून यामुळे अर्थव्यवस्थेला अधिक गती मिळणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

**नाशिक येथे आय टी पार्क**

नाशिक येथे आय टी पार्क विकसित करण्यात असून या कामासाठी वास्तू विषारदाची नेमणूक झाली आहे. लवकरच येथे अद्ययावतआयटी पार्क निर्माण केला जाईल.मुख्यमंत्री म्हणाले, राज्यातील जनतेने मोठ्या आत्मविश्वासाने जबाबदारी सोपवली आहे. ही जबाबदारी पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकत्रित काम करून राज्याला विकासात प्रथम क्रमाकांवर कायम ठेवूया.विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राच्या विकासाची दिशा आणि दृष्टीकोन स्पष्ट करताना सरकारच्या पुढील वाटचालीबाबत मनोदय अशा ओळीतून आपली भूमिकाच मांडली...

**या ओळी पुढीलप्रमाणे...**

महाराष्ट्र आता थांबणार नाही... सोबत राहू एकदिलाने, घडवू महाराष्ट्र पुन्हा नव्याने, समृद्धीचा वेग कुणी रोखणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही... उद्योग, गुंतवणूक येतेय जोमात बेरोजगारांना देऊ रोजगाराची साथ तरुणाईचं स्वप्न कधी भंगणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही... रस्ते, पूल, रेल्वेचे धागे, सुखदायी प्रवासाचे स्वप्न होईल जागे, गतीला स्थगिती मिळणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही... विकासाच्या स्वप्नांसोबत सेतू अटल मुंबईच्या वेगासाठी आहे कोस्टल मराठी माणसाचे स्वप्न भंगणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही... जलयुक्त शिवार देईल नवजीवन, नदीजोड प्रकल्प फुलवतील नंदनवन राज्यात दुष्काळ कुठे दिसणार नाही महाराष्ट्र आता थांबणार नाही... पाणंद रस्त्यांनी जोडू शेतशिवार आनंदाचा शिधा देईल आधार उपाशी पोटी कुणी झोपणार नाही, महाराष्ट्र आता थांबणार नाही... लाडक्या बहिणींना मिळाला स्वाभिमान ज्येष्ठांना मोफत प्रवासातून सन्मान लाडक्या लेकी कधी दुःखी होणार नाही अन् महाराष्ट्र आता थांबणार नाही... असेल विरोधकांचे कमी संख्याबळ, सारे टिकवून ठेऊ लोकशाहीचे बळ कोणत्याही आमदाराचा मानसन्मान घटणार नाही महाराष्ट्र आता थांबणार नाही...

# लक्की फ्यूल स्टेशनमुळे ग्रामिण भागातील वाहनचालकांची होणार सोय-पोटभरे

**वडवणी (प्रतिनिधी) :** वडवणी तालुक्यातील ग्रामीण भागातील व विशेषतः खेडच्यापाडच्यातील वाहन चालकांना आपल्या वाहनांमध्ये इंधन टाकण्यासाठी शहराच्या ठिकाणी यावे लागते. परिणामी त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही व्यर्थ वाया जातो. मात्र वडवणी शहरापासून ढोरवाडी शिवारामध्ये उजगरे परिवाराने सुरु केलेल्या या हिंदुस्तान पेट्रोलियमच्या लक्की फ्यूल स्टेशनमुळे या गावच्या परिसरातील जवळपास पाच ते सहा गावातील व या राज्य महामार्गावरील वाटसरु वाहन चालकांना इंधनाची चांगली सोय निर्माण झाली असून या ठिकाणी असलेल्या शुध्दता व प्रामाणिकता यामुळे परिसरातील वाहन चालकांमध्ये निश्चितपणे समाधान निर्माण झालेले आहे. पूर्वी अतिशय बिकट परिस्थितीतून वडवणीतील या उजगरे परिवाराने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूलमंत्र दिलेल्या शिक्षणाची कास धरुन प्रगतीकडे उंच गरुडझेप घेतली आहे. यामुळे या परिवाराचा आपणांस नेहमीच अभिमान वाटतो असे मनोगत बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी व्यक्त केले. याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी शहरापासून अगदी जवळच असलेल्या २३२ पिंपळनेर-



ढोरवाडी वडवणी या राज्य महामार्गावर ढोरवाडी शिवारामध्ये हिंदुस्तान पेट्रोलियमचे लक्की फ्यूल स्टेशन याची उभारणी वडवणी येथील उजगरे परिवारातील स्नूषा सौ. नूतन बाबासाहेब उजगरे यांनी केली आहे. याचा शुभारंभ दिनांक १५ डिसेंबर २०२४ रविवार रोजी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी उद्घाटक म्हणून बीड जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भगवान फुलारी यांची उपस्थिती लाभली.तर विशेष उपस्थिती म्हणून एचपी बीडचे सेल्स ऑफिसर प्रथमेश सोलापूरे त्याचबरोबर उपशिक्षणाधिकारी मोहन काकडे, उपशिक्षणाधिकारी भगवानराव सोनवणे, उपशिक्षणाधिकारी रंगनाथ राऊत, उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, शिरुरचे गटशिक्षणाधिकारी शेख जमीर, सहाय्यक निबंधक बाबासाहेब गायकवाड, उपकार्यकारी अभियंता शशिकांत गायकवाड, नवोदय विद्यालय उपप्राचार्य सूर्यकांत गायकवाड यांची उपस्थिती लाभली. तर मुख्य अतिथी म्हणून बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, माजी आमदार केशवराव आंधळे, नगराध्यक्ष शेषेराव जगताप, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, ज्येष्ठ नेते सोमनाथराव बडे, नगरसेवक सुधीर ढोले, माजी नगरसेवक महादेव जमाले, काँग्रेसचे नेते दादासाहेब मुंडे, वैद्यकीय तज्ञ डॉ. शंकर वाघ, राष्ट्रवादीचे नेते डॉ. प्रकाश जेधे, माजी सभापती दिनकरराव आंधळे, ज्येष्ठ नेते बाबुशेठ नहार, माजी जिल्हा परिषद सदस्य सर्जेराव आळणे, माजी गटशिक्षणाधिकारी गौतम चोपडे, सरपंचमहेश शिंदे, सरपंच बाबासाहेब कवचट, सरपंच आत्माराम माने, सरपंच सोमनाथ वडमारे, सरपंच उत्तरेश्वर खताळ, युवा नेते बजरंग गायकवाड, संपादक अनिल वाघमारे, पत्रकार सुधाकर पोटभरे, पत्रकार अविनाश मुजमुले, पत्रकार अर्जुन मुंडे, माजी उपसरपंच पंडित उजगरे, विधिज्ञ ॲड. श्रीराम लंगे, विधिज्ञ ॲड. भास्कर उजगरे, उद्योजक संतोष डावकर, माजी सरपंच राजू वाघमारे, युवा नेते अमरसिंह मस्के, युवा नेते श्रीराम मुंडे, युवा नेते सुग्रीव मुंडे यांसह सर्वपक्षीय मान्यवर, विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तिमत्व, वडवणी तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, शिक्षक बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार उजगरे परिवाराच्या वतीने लक्की फ्यूल स्टेशनच्या संचालिका सौ. नूतन बाबासाहेब उजगरे यांच्यासह अर्जुनराव उजगरे, नगरसेवक भिमराव उजगरे, गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विक्की शिंदे, शुभम उजगरे, रमेश झोंबाडे, दादासाहेब शिंदे, जालिंदर थोरात यांनी परिश्रम घेतले.

### सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी

# सकल मराठा समाजाचे मुख्यमंत्र्याना निवेदन

**माहूर (प्रतिनिधी) :** मसाजोग जि. बीड येथील सरपच संतोष देशमुख निर्घुण हत्या प्रकरणाचा निषेध करून सदर हत्याकांडातील मुख्य आरोपीसह इतर सर्व आरोपींना अटक करून त्यांचे विरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी असे निवेदन सकल मराठा समाज तालुका माहूरच्या वतीने मुख्यमंत्र्यांना तहसीलदार माहूर यांचे मार्फत निवेदन सादर केले. सदर घटनेने सकल मराठा समाजाच्या तीव्र भावना दुखावल्या आहेत. तसेच सदर प्रकरणातील आरोपितांचे राजकीय लोकाशी संबधित असल्याची बाब सुद्धा समोर आली आहे. सदर प्रकरणाशी संबधित लोकांचे फोन कॉल तपासून संबधित लोकांची चौकशी करून त्यांचे विरुद्ध कारवाई करण्यात यावी व पिडीत संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांचे पुनर्वसन करण्यात यावे व त्यांच्या कुटुंबास १ कोटी रुपये शासकीय मदत द्यावी. त्यांच्या कुटुंबातील सदस्यास शासकीय नौकरीत समावून घ्यावे तसेच सदर प्रकरणाची एसआयटी चौकशी करून बीड जिल्ह्यातील विशिष्ट समुदायातील लोकांची गुंडगिरी बंद करून बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचे राज्य असल्याची स्थिती निर्माण करण्यात यावी अशी मागण्याचा निवेदनात समावेश आहे.सदर मागणीस मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ता. सचिव कॉ.किशोर पवार यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. निवेदनावर आनंद पाटील तुपदाळे , राजकिरण देशमुख , बाळासाहेब देशमुख शिऊरकर, ज्ञानेश्वर चौधरी , जयकुमार अडकीने , अवधूत देशमुख, जयकांत मोरे, निखील शिंदे, रवी पराते, अविनाश कदम, सुभाष इंगोले, दत्ता बोबडे, मंगेश सुकळकर, अनिल पाटील हडसनीकर, काशिनाथ कदम, ॲड जगदीश अडकीने, सतीश चौधरी, विनोद पाटील हडसनीकर, मंगेश जाधव आदीच्या स्वाक्षऱ्या आहेत. नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी निवेदनाचा स्वीकार केला, निवेदनाची प्रत पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे पो.कॉ. गजानन जाधव यांना सादर करण्यात आली.

# रुपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

## भुली बिसरी यादे.. मधून जुन्या आठवणीना उजाळा तर महाराष्ट्राच्या अस्मितेचे दर्शन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**







अ.ए.सो. चे रुपीबाई मोतीलालजी बोरा-न्यू इंग्लिश स्कूल, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडले. तसेच विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी भरविण्यात आलेल्या कला, कार्यानुभव, रांगोळी, गणित व विज्ञान प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

संध्याकाळी संस्थेच्या डॉ.आर.बी. मोने कला मंदिरात स्नेहसंमेलनाचा सांस्कृतिक कार्यक्रम रंगला होता. पहिल्या दिवशी (इयत्ता ५ वी ते ८ वी) झालेल्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन आदर्श सरपंच रोहिणीताई लवांडे तर दुसऱ्या दिवशी (इयत्ता ९ वी ते १२ वी) झालेल्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन आनंदऋषीजी हॉस्पिटलचे प्रशासनाधिकारी डॉ. आशिष भंडारी यांच्या हस्ते झाले. यावेळी पायल भंडारी, संस्थेचे उपाध्यक्ष अशोक मुथा, प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, विश्वस्त सुनंदाताई भालेराव, ड. गौरव मिरीकर, सल्लागार भूषण भंडारी, विद्यालयाचे प्राचार्य अजयकुमार बारगळ, उपप्राचार्या वंदना आरण्ये, पर्यवेक्षक बाळासाहेब वाबळे, शिक्षक प्रतिनिधी नितीन कमलकर, विद्यालयाचे आदर्श छात्र सिद्धार्थ लांडगे, सोहम गांधी, आदर्श छात्रा संचिता लांडगे, कीर्ती गुंड आदींसह शालेय शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले. त्यांनी विद्यालयातील गुणवत्ताधारक तसेच कला, क्रीडा व विविध क्षेत्रातील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करत विद्यालयाच्या प्रगतीबद्दल कौतुक केले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य अजयकुमार बारगळ यांनी सर्व पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपस्थित पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे प्रदर्शन पाहून तयार केलेल्या विविध कलाकृतींचे व त्यांच्यातील जिज्ञासूवृत्तीचे भरभरून कौतुक केले.

आदर्श सरपंच रोहिणीताई लवांडे यांनी माजी विद्यार्थी या नात्याने शाळेविषयीच्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी आदर्श गाव निर्मिती करण्यापासून ते माजी राष्ट्रपती प्रतीभाताई पाटील यांच्या हस्ते आदर्श सरपंच पुरस्कार मिळेपर्यंतच्या खडतर प्रवासाचे वर्णन करत वेळोवेळी शालेय जीवनातील शिस्त आणि संस्कार याचा कसा फायदा झाला? याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. आशिष भंडारी यांनी आपल्या शालेय जीवनातील संस्कार व शिस्तीचा उपयोग त्यांना दररोजच्या प्रशासकीय कामात होत असून, त्या संस्कारांमुळेच निर्माण झालेल्या सामाजिक जाणीवेतून दररोज समाजातील सर्व थरांतून येणाऱ्या रुग्णांची सेवा केली जाते. कोरोना या जागतिक महामारीमध्ये आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून केलेल्या समाजसेवेबद्दल कोरोना योद्धा हा पुरस्कार मिळाला तर जनतेकडून देवदूतची उपाधी मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख अतिथींचे स्वागत घोषपथकाच्या माध्यमातून करत मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीपूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी विद्यालयाच्या एन.सी.सी. छात्रांनी पाहुण्यांना मानवंदना दिली. विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीतांद्वारे मान्यवरांचे सूर-तालात स्वागत केले. सदर वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात पाहुण्यांच्या हस्ते शैक्षणिक, कला, क्रीडा व विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण देऊन सन्मान करण्यात आला.

सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात सुमारे ८० ढोलवादक विद्यार्थ्यांच्या घोषपथकाने झाली. विद्यार्थ्यांनी बालगीते नाच रे मोरा.. गणेशवंदना..खंडोबाचा जागर.. या लोकप्रिय गीतांवर लयबद्ध सादरीकरण केले. सहभागी सर्वांचे मान्यवरांनी विशेष कौतुक केले. यावर्षी इ.५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी भुली बिसरी यादे.. तर इ.९ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांनी अस्मिता महाराष्ट्राची... या विषयावर बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.भुली बिसरी यादे.. मध्ये अनेक जुन्या गाण्यांच्या माध्यमातून जुन्या आठवणीना उजाळा देण्यात आला तर अस्मिता महाराष्ट्राची.. मधील गाण्यांद्वारे आपल्या महाराष्ट्रातील संस्कृतीचे दर्शन घडविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन कराळे व मोनाली खोचरे यांनी केले तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ नजान व स्मिता कुलकर्णी यांनी केले. आभार शिक्षक प्रतिनिधी नितीन कमलकर यांनी मानले.